ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**सप्टेंबर २००८**
**वर्ष २८ वे, अंक ९ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
मुखपृष्ठ : **गिरीश कुळकर्णी**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@yahoo.com
granthali01@rediffmail.com
marathividyapeeth@rediffmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

'रुची' दिवाळी अंकाची तयारी जोरात आहे, अशा बेताला गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकाचे कौतुक करणारे एका वाचकाचे पत्र आले आहे. त्याला सर्क्युलेटिंग लायब्ररीमधून तो अंक अलिकडे उपलब्ध झाला. त्यामुळे अर्थातच उमेद वाढली आहे. या वर्षीचा दिवाळी अंक ऑक्टोबर अखेर प्रसिद्ध होईल. त्याचे संपादन कवयित्री अंजली कुळकर्णी करत आहे. अंकाचे तपशील पुढील, १० ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध होतील.

शिक्षकदिन नुकताच साजरा झाला. त्याचे निमित्त ठेवून पुण्यात शिक्षकांनी 'व्यासपीठ' नावाचा एक उपक्रम अलिकडेच सुरू केला त्याची माहिती दिली आहे. 'ग्रंथाली'ने राम जोशी, लीला पाटील, रमेश पानसे, अरविंद वैद्य, भाऊ अशांची शिक्षणविषयक पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. गतवर्षी हेरंब कुलकर्णीचे 'शाळा आहे पण शिक्षण नाही' हे पुस्तक प्रसिद्ध करताना शिक्षकांच्या 'नेटवर्क'ला चालना देण्याचा कार्यक्रम जाहीर केला. तो त्यावेळी मूळ धरू शकला नाही. शिक्षणाचा प्रसार होत आहे, त्याबरोबर गुणवत्तेची कास धरणारा वर्गही तयार होत आहे, ही मोठी आशेची गोष्ट आहे. या घटनेचा सर्व संवेदनाशील व विचारी मंडळींनी पुरस्कार करायला हवा.

अंकामध्ये 'अमेरिकेतून' या सदराखाली विजय जोशी वेगळ्या काही जगातले काही लेखन आपल्यासमोर सादर करणार आहेत. त्यांचे 'विचारवेध' या नावाचे तीन संग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहेत. त्यातून पाश्चात्य जगातील विचारसंकल्पनांचा परिचय करून देण्यात आला आहे. ज्यांनी ती पुस्तके पाहिली असतील त्यांना जोशी यांच्या सखोल विचारचिंतनाची कल्पना आली असेल. त्यांच्या या नियमित पण वेगळ्या लेखनाबद्दल औत्सुक्य आहे.

चुनेकर यांचे 'भाषाभान' व्यापक होत आहे व त्याचबरोबर वाचकांना ओढही लावत आहे हे मिळणाऱ्या प्रतिसादावरून जाणवते.

समकालीन सामाजिक-सांस्कृतिक विषयांवरील विचारवेधक लेखन 'रुची'त प्रसिद्ध करण्याचा सतत प्रयत्न राहिला आहे. वाचकांच्या प्रतिक्रियेबद्दल सतत उत्सुकता असते.

**– संपादक**

## अनुक्रम


- **सोमणबाई – नाबाद ८५**/नीलेश साठे/२
- **माझी सहिष्णू नास्तिकता**/प्रमोद तावडे/३
- **रोबोदेव**/प्रेमला काळे/५
- **आचार्य अत्रे : एक झुंजार पौरुष** /मं.गो. राजाध्यक्ष/७
- **शब्दबंधातील ठेव ही! : ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीची दीडशे वर्षे**/हेमंत शेट्ये/१०
- **माणसाला मरण नसतं तर?**/कृ.ना. कुडाळकर/१२
- **'उंची', कवी दत्ता हलसगीकरांची!**/सदानंद डबीर/१४
- **'सशक्त' की 'कसदार'?**/जयवंत चुनेकर/१५
- **अमेरिकेतील मराठी माणसाचे भावजीवन**/ पद्मा कऱ्हाडे/२७

# सोमणबाई – नाबाद ८५

आमच्या घरी गेली दोन वर्षे उन्हाळ्याच्या दिवसात पुढील संवाद अनेकदा कानावर येतो.

''सोमणआजी, तुम्ही मला भाजी चिरून दिली आहे नं, आता पोळ्या मी करणार.''

''अगं निलांबरी, तू आवर तुझं, मी करते पोळ्या.''

''माझ्यासारख्या तरण्याताठ्या बाईनं आयतं खायचं अन् पंचाऐंशी वर्षांच्या तुम्ही... तुम्हाला मी दूध देते, ते घ्या अन् 'लोकसत्ता' वाचा सकाळचा.''

''मला काय होतं, कामं न करायला? मी हातपाय हलवते म्हणूनच ??? कधी आजारी पडत नाही.''

माझ्या पत्नीच्या व सोमणबाईंच्या ह्या प्रेमळ संवादाची मला ह्या सवय झाली आहे. आमच्या सोमणबाईंना याही वयात स्वयंपाकाची हौस दांडगी. वयोमानानुसार हाताला कंप सुटतो, एका पंजाला तर बधिरता आली आहे. त्यामुळे हातून काहीतरी पडतं, मग आपणच खजील होऊन म्हणतात, ''आजकाल पूर्वीसारखं नाही जमत बघ'' विस्मरणानं कधी भाजीत मीठ दोनदा घातलं जातं तर कधी अजिबात नाही. आमच्या जिभेवर अमृत असल्यानं व दुसऱ्यांच्या भावना जपायची सवय असल्यानं, आम्ही त्यांनी केलेलं सर्व काही, मोठ्या चवीनं त्यांना उणं न दाखवता अन्न हे पूर्णब्रह्म या भावनेनं चवीनं खातो.

सोमणबाईंना ख्यालीखुशाली विचारण्यासाठी मागील वर्षी नागपूरला फोन केला असता त्यांनी नागपूरचा कडक उन्हाळा, वीज मंडळाचं लोडशेडिंग, त्यामुळे घरात वातानुकुलित यंत्र असूनही जिवाची होणारी तगमग वर्णन केली. हिंनं लागलीच त्यांना मुंबईला आमच्या घरी येण्याचं निमंत्रण दिलं. त्याही विमानानं आल्यादेखील!

आल्या दिवसापासून आमच्या सातव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये येणाऱ्या पूर्व-पश्चिम वाऱ्याचं कौतुक. ''मी गेली पन्नास वर्षे मुंबईला येत आहे पण भर उन्हाळ्यातदेखील पंखा न लागणारं घर पहिल्यांदाच बघते आहे.''

मागील वर्षी उन्हाळ्याचे दोन महिने आमच्या घरी राहून सोमणबाई नागपूरला परतल्या ते पुढील वर्षी पुन्हा येण्याचं आश्वासन देऊनच.

यंदा माझी बढती व बदली होऊ घातली होती. माझ्या मुलाच्या, कौस्तुभच्या दीक्षांत समारंभाला अमेरिकेला जायचं चाललं होतं, तरी आम्ही त्यांना प्रेमानं लगेच मार्चमध्ये बोलावलंच अन् त्या पण तितक्याचं प्रेमाने आल्या. यंदाचं त्यांचं येणं तर आम्हाला अधिकच भाग्याचं व आनंदाचं ठरलं. त्यांच्या आशीर्वादानं बढती तर झाली पण बदली न होता मुख्यालयातच नवीन जबाबदरीचं पद मिळालं. आम्हा दोघांनाही अमेरीकेचा दहा वर्षांचा व्हिसा मिळाला पण अमेरिकेला हिंनं एकटीनंच जायचं ठरलं.

''तू काळजी नको करूस. माझं आणि निलेशचं जेवणखाण मी करू शकते'' या त्यांच्या शब्दांनी हिंनं निर्धास्तपणे अमेरिकेला जायचं नक्की केलं.

घरातल्या वृद्ध मंडळींच्या अपेक्षा तरी किती कमी असतात! त्यांची इच्छा स्वयंपाकात जमेल तेवढी मदत करायची असते. त्यांना रोज थोडा वेळ त्यांच्याशी घरातल्या मंडळींनी संवाद साधावा असं वाटतं; त्यांना योग्य तो मान मिळावा असं वाटतं.

त्यांना बोलावण्यामागे आमचा स्वार्थ काय? तर आईच्या निधनानं आमच्या आयुष्यात मी दोनच वर्षांपूर्वी निर्माण झालेली पोकळी कमीतकमी दोम महिने तरी भरून निघावी!

ही त्यांना सोमणआजी म्हणत असली तरी मी मात्र सोमणबाईच म्हणतो, कारण त्या माझ्या आईबरोबर नागपूरच्या हडस हायस्कूलमध्ये शिक्षक होत्या. दोघी स्वयंभू व परिस्थितीला निर्भयपणे तोंड देणाऱ्या, तुटपुंज्या मिळकतीत पुढच्या पिढीच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या, जीवनातील मूल्यं नेमस्तपणे, अत्यंत साधेपणानं जपणाऱ्या आणि ते करत असताना कुठलीही तडजोड मान्य न करणाऱ्या. एवढे समान गुण असल्यावर त्यांची घनिष्ट मैत्री ही होणारच.

त्या दोघींनीही सायंकाळचे वर्ग करून ग्रंथालय-विज्ञान विषयांचा नागपूर विद्यापीठाचा अभ्यासक्रम १९७० मध्ये पूर्ण केला. तेव्हापासून त्यांची मैत्री अधिकच दृढ झाली, अन् माझ्या आईला कर्करोग झाल्याचं निदान १९७२ मध्ये झालं तेव्हा अमेरिकेला मुलीकडे जायचं पुढे ढकलून मुंबईला डॉ. अजित फडके यांच्या कॉलनी नर्सिंग होममध्ये व नंतर टाटा मेमोरियल इस्पितळात त्यांनी आईची सावलीसारखी सोबत केली.

पुढे सोमणकाकांना पक्षाघात झाल्यावरसुद्धा त्यांनी डोळ्यांत टिपूस येऊ न देता, समर्थपणे थोडीथोडकी नाहीत... तर तब्बल सात/आठ वर्षं त्यांची सेवा केली. नंतर बरीच वर्षं त्या अमेरिकेत मुलांकडे जायच्या पण 'आता माझं कितीसं आयुष्य उरलंय? मला अमेरिका म्हणजे तुरुंग वाटतो.' स्वातंत्र्यवीर सावरकरांवर नितांत श्रद्धा असलेल्या सोमणबाई 'ने मजसी ने परत मातृभूमीला' असे म्हणून भारतात परतल्या, ते पुन्हा अमेरिकेत पाऊल ठेवायचे नाही हे ठरवून. त्यांनी पासपोर्ट, व्हिसा, ग्रीनकार्डाचं नूतनीकरणही केलं नाही.

अशा आमच्या सोमणबाईंना २५ मे ला वयाची ८५ वर्ष पूर्ण झाली. त्यांनी अशाच कणखरपणाने आयुष्याचे शतक पूर्ण करावं व दरवर्षी उन्हाळ्याचे किमान दोन महिने आम्हाला त्यांचा सहवासाचा गारवा व प्रेम लाभावा ही प्रार्थना.

**– नीलेश साठे**

# माझी सहिष्णू नास्तिकता

प्रमोद तावडे

''खरोखरच 'देव' अशी काही गोष्ट अस्तित्वात आहे काय?'' हा प्रश्न बालवयापासून माझ्या मनात ठाण मांडून बसलेला आहे. गेल्या सुमारे पंचेचाळीस वर्षांनंतरही या सनातन प्रश्नाचं समाधानकारक उत्तर मला सापडलेलं नाही, पण ते शोधण्याच्या प्रक्रियेतून आणि त्याबद्दलची अनावर जिज्ञासा शमवण्याच्या प्रयत्नातून परमेश्वरनामक गौडबंगाल मला कितपत आणि कोणत्या स्वरूपात उमजलं ते व्यक्त करण्याचा हा प्रयत्न.

देवळात बसून वा स्वर्गातून दर्शनेच्छूंनी वा भक्तगणांना कृपाप्रसादाचं वाटप करणारा किंवा महापूजेचा प्रसाद सेवन केल्यामुळे खूष होणारा आणि न केल्यास क्रोधित होणारा 'सत्यनारायण' मला कधी पटलाच नाही. पण याचा अर्थ माझं त्याच्याशी वैर आहे असं मात्र नाही. 'दीवार' या हिंदी चित्रपटातल्या अमिताभचं देवाशी वैर असतं. देवानं त्याच्यावर अन्याय केला म्हणून तो त्याच्याशी भांडणही करतो. माझं मात्र तसं नाही, कारण माझ्या मते, 'काल्पनिक' असलेल्या संकल्पनेबरोबर भांडणं निरर्थक नाही का? अशा देवाला (वा त्याच्या प्रतिकृतीला) मी कधीही नमस्कार करत नाही असंही नाही. मी अनेकवार देवाला नमस्कार करतो. मी सत्यनारायणाच्या पूजेलाही जातो. (केवळ विनामूल्य मिळणारा प्रसाद या मतलबी हेतूनं नव्हे!) चौरंगावरच्या ढिगाऱ्यापुढे हात जोडतो. म्हणजे नमस्काराची ती केवळ शारीरिक क्रिया असते! ही क्रिया त्या देवासाठी नसते, तसंच ती माझ्या स्वतःसाठीही नसते. ती त्यावेळी तिथं उपस्थित असणाऱ्या इतर व्यक्तींसाठी असते. नास्तिकता ही माझी व्यक्तिगत धारणा आहे. मी ती लपवत नाही अन् मिरवतही नाही. मात्र, त्याची गर्दीसमोर जाहिरात होणं मला प्रशस्त वाटत नाही. केवळ इतरांचं लक्ष वेधून घेऊन काहीच साध्य होणार नाही हे लक्षात घेऊन तशी अभिव्यक्ती टाळण्याकडे माझा कल असतो.

मी देवासंबंधीची माझी भूमिका वेळोवेळी शांतपणे, निवांतपणे स्पष्ट करत असतो. मी मित्रमंडळी व कुटुंबीयांसमवेत होणाऱ्या वादविवाद आणि चर्चेतून या विषयावरील माझं मत अनेकवार स्पष्टपणे मांडत आलेलो आहे! देव, धर्म, जात, धार्मिक विधी यांत मला काडीचाही रस नाही, पण

**आषाढ-श्रावण वगैरे धार्मिक महिन्यांचा हा काळ आहे. अशा वेळेला देवधर्माकडे सहिष्णुतेने पाहण्याचा हा दृष्टिकोन कसा वाटतो?**

**योगायोग असा, की 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'मध्ये काही महिन्यांपूर्वी 'देव जाणिला कुणी' नावाचे, प्रेमला काळे यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यातील 'रोबो देव' नावाचे छोटे प्रकरण, पुरवणी वाचन म्हणून या लेखासोबत छापत आहोत. देवाविषयीचे हे वाचन करमणूक करतोच, विचारालाही चालना**

तरीही सगळे सण, सोहळे आणि उत्सव कुटुंबीय-मित्रमंडळींसह आवडीनं साजरे करतो. मी गुढीपाडव्याला तोरण बांधतो, दसऱ्याला श्रीखंडावर ताव मारतो. त्याचप्रमाणे ३१ डिसेंबरला (ख्रिस्ती वर्षअखेर) मित्रांबरोबर रात्रभर जागरणही करतो. मी असे क्षण मिळवण्यासाठी निमित्त शोधत असतो. सण, समारंभ, जन्मतारीख, लग्नतिथी हे केवळ निमित्त असतं. त्यातल्या कर्मकांडांना माझा वैयक्तिक (सैद्धांतिक) विरोध आहे, पण त्याप्रसंगीचं वेगळं वातावरण आणि आप्तस्वकीयांसह सहजीवनाचा अनुभव (रुचिपालट) आनंददायी असतो. असे क्षण आपलं भावविश्व समृद्ध करणारे असतात.

सर्वांत गमतीदार प्रसंग दरवर्षी गणेशचतुर्थीच्या दिवशी माझ्या घरीच घडतो. आमच्या घरी गणेशोत्सवात गणपतीची मूर्ती आणली जात नाही, पण आमच्याही घरात देव्हारा आहे आणि त्यात देवाची तसबीर आहे. गणपतीची एक छोटीशी मूर्तीसुद्धा आहे (दूध न पिणारी!). गणेशचतुर्थीला माझी पत्नी घरी उकडीचे मोदक बनवते. एकवीस मोदकांचा नैवेद्य माझ्या हस्ते गणपतीला दाखवून ती माझ्याकडून त्याला नमस्कार करवून घेते! मी कोणतीही खळखळ न करता निमूटपणे तिचं आज्ञापालन करतो. माझ्या मनात अजिबात भक्तिभाव नाही हे तिलाही माहीत असतं, तरीही तिचा हट्ट असतो आणि मी तो पुरवतो. याचं कारण काल्पनिक गणपतीपेक्षा प्रत्यक्ष माझ्या कुटुंबीयांचं समाधान करणं हे मला अधिक महत्त्वाचं वाटतं. गणपतीला खूष केल्यामुळे मला किती पुण्य लागतं ते तो गणपतीबाप्पाच जाणो! पण बायकोला खूष केल्यामुळे (तिचं मन न दुखावल्यामुळे) मिळणारं समाधान तर मला अनुभवता येतं. मी माझी मतं इतरांना पटवण्याचा प्रयत्न करतो, पण ती सक्तीनं लादणं मला पाप वाटतं.

देवाधर्माबाबत माझ्या मतांशी सहमत असणाऱ्या मित्रांपैकी एकजण, स्वतःच्या मतांबाबत 'कडवा' म्हणण्याइतका आग्रही आहे. कमालीच्या भाविक असलेल्या त्याच्या

बायकोनं देवाला एक नवस केला होता. (कर्मधर्मसंयोगानं?) तो देव नवसाला पावला. तो नवस फेडण्यासाठी (सौदा पूर्ण करण्यासाठी!) तिला तिच्या नवऱ्यासह सत्यनारायणाची पूजा करायची होती. माझ्या मित्राचा तिच्या पूजेला विरोध नव्हता पण तो स्वतः त्या पूजेला बसणार नाही हा त्याचा हेका कायम होता. पूजेला बसला तर त्याच्या स्वतःच्या भूमिकेशी प्रतारणा आणि शिवाय, त्याची मित्रपरिवारात टिंगल होईल आणि बसला नाही तर देवाचा कोप! अशा तिढ्यामुळे त्यांच्यात गंभीर स्वरूपाचा कौटुंबिक संघर्ष होऊ लागल्यावर, मी त्या प्रकरणात हस्तक्षेप केला. त्याला त्या पूजेला बसण्यास राजी करण्यात मला यश मिळालं. मी भांडण मिटवल्याचं पुण्य कमावलं! मी माझ्या माणसांना धार्मिक कर्मकांडं करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो, पण यात यश न आल्यास मी त्यांना या कामासाठी सहकार्यच करतो.

तथापी माणसात आढळणारं देवत्व मात्र मला अनेकवार भुरळ घालतं. दिल आणि दिमाख (मन आणि मेंदू) यांच्या विस्मयकारक प्रभावानं व्यक्त होणारे अनेक विलक्षण प्रसंग, घटना माझ्यासाठी साक्षात्कारी असतात, भारावून टाकणारे असतात. मी त्या व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यासमोर नतमस्तक होतो. मी अशा काही व्यक्तींच्या पायाला हात लावून स्वयंप्रेरणेनं नमस्कार करतो. मला त्यांच्याप्रती वाटणारा आदर व्यक्त करण्याची संधी साधण्यात मला कोणताही संकोच वाटत नाही. कलाकार, शास्त्रज्ञ; त्याचप्रमाणे समाजासाठी, समाजाच्या कोणत्याही घटकासाठी भौतिक सुखाच्या पलीकडे जाऊन तळमळीनं कार्य करणाऱ्या अनेक विभूतींना, मी संधी मिळताच प्रत्यक्ष अन्यथा मनोमन वंदन करतो.

पर्यटनप्रसंगी, एखाद्या देवळात देवदर्शनासाठी जाणाऱ्या आमच्या ग्रूपच्या पादुकांचं देवळाबाहेर राहून रक्षण करण्याचं काम माझ्याकडे असतं, पण आतली मूर्तीही देवळाच्या स्थापत्यकलेप्रमाणे उल्लेखनीय असेल तर तिचं 'दर्शन' घेणं मी चुकवत नाही. एकंदरीत, जिवंत प्राण्याच्या आनंदाला कारणीभूत होणाऱ्या प्रत्येकात मला देवाचं दर्शन होतं.

मला अनेकदा असा प्रश्न विचारण्यात येतो, की ज्या कलाकारांना, शास्त्रज्ञांना आणि सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या तपस्वींना तू प्रमाण मानतोस त्या व्यक्तीही वैयक्तिक जीवनात जर देव मानत असतील तर तुझी देवाच्या अस्तित्वाशी असहमती का? हा विरोधाभास नाही का? त्याचं उत्तर असं, की शास्त्रज्ञांच्या संशोधनाला, कलाकारांच्या प्रतिभेला आणि अभिव्यक्ति–क्षमतेला; त्याचप्रमाणे दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी स्वतःचं जीवन वेचणाऱ्यांच्या तळमळीला मी सलाम करतो, पण त्यांच्या मतांना वा विचारसरणीला नव्हे.

आपण आपल्या आयुष्यातील जन्म ते मृत्यू या प्रवासात अनेक धार्मिक विधी इमानेइतबारे करत असतो. मला धर्माची ही कर्मकांडं निरर्थक वाटतात. तो पैसा, वेळ व कष्ट यांचा अपव्यय आहे. त्यानिमित्तानं होणाऱ्या आप्तमित्रांच्या स्नेहसंमेलनाखेरीज त्यातून इतर काहीच साध्य होत नाही. आपण बारशापासून बाराव्यापर्यंत करत असलेल्या यातील कर्मकांडांना फाटा देऊन, त्याऐवजी ते वाचलेले पैसे एखाद्या समाजोपयोगी कामावर खर्च करता येतील. त्यातून मिळणारा आनंद सार्थकतेचा समृद्ध अनुभव देतो असं माझं अनुभवसिद्ध मत आहे.

मी माझ्या मृत्यूनंतर माझ्या शरीराचं देहदान करण्याचा संकल्प केला आहे. रक्तदान, नेत्रदान व देहदान ही सर्वांत जास्त महत्त्वाची पुण्यकर्मं आहेत असं मला वाटतं. अर्थातच असे विचार असणारा मी एकटाच नाही. निरीश्वरवादी विचारवंतांमध्ये गौतम बुद्धापासून स्वामी विवेकानंदांपर्यंत आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून शहीद भगतसिंगांपर्यंत अनेकांचा समावेश होतो. ही विचारसरणी मान्य करणारे माझ्यासारखे सर्वसामान्य जरी कित्येक असले तरी एकुणात अल्पसंख्य भरतील आणि याचीच खंत आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या आगरकरांपासून आजच्या श्रीराम लागूंपर्यंत अनेक विचारवंतांनी हे विचार समाजात रुजवण्याचे प्रयत्न केले. स्वतः त्यांनी समाजाचा रोष पत्करून ते आचरणात आणले. विज्ञान–तंत्रज्ञानाच्या विस्मयकारक प्रभावामुळे, सामाजिक परिस्थितीत खूपच बदल झाला आहे. त्यामुळे त्यानुसार आचरण करणं फारसं कठीण नाही. गरज आहे ती फक्त विवेक आणि इच्छाशक्ती यांची.

मात्र मी पापपुण्याचं खातं सांभाळणारा परमेश्वर अस्तित्वात नाहीच असं छातीठोक विधान करत नाही, पण तो आहे याचीही मला खात्री नाही. त्यामुळेच माझं उत्तर अज्ञेयवाद्यांप्रमाणे 'माहीत नाही' हेच आहे. मला अंधारात दगड मारून भ्रामक सुरक्षितता मिळवावीशी वाटत नाही. माझा माझ्या स्वतःच्या विचारशक्तीवर पूर्ण विश्वास आहे. मला तिच्या मर्यादांचीही जाणीव आहे. त्यामुळे मी प्राप्त परिस्थितीत माणसाच्या सदसद्विवेक बुद्धीला प्रमाण मानणं श्रेयस्कर मानतो. एकंदरीत, माझी ही नास्तिकता कडवी नसल्यामुळे 'तकलादू' आहे असं तुम्ही म्हणाल, पण मी मात्र त्याला 'सहिष्णू' असे गोंडस विशेषण लावतो!

---

**प्रमोद तावडे**

**ब–३०८, नवीन गौरव, पेंडसे नगर,**

**डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१**

**दूरध्वनी ९८६७२२२८४२**

**विनंती**

'रुची'ची दोन वर्षांची वार्षिक वर्गणी फक्त १०० रुपये आहे; तेवढ्या रकमेचा, 'ग्रंथाली' नावाचा चेक पाठवून द्यावा.

# रोबोदेव

## प्रेमला काळे

सतराव्या शतकात शास्त्रीय क्रांती झाली आणि एकामागून एक नवीन शोध लागू लागले. सिद्धांत नुसते मांडले गेले नाहीत तर त्यांचे निष्कर्षही कार्यान्वित होऊ लागले. जर्मनीत १८३५मध्ये पहिली रेलगाडी धावली आणि देव काय करू शकतो आणि काय नाही याविषयी चर्चा सुरू झाली. एकविसाव्या शतकाने तर, तांत्रिक प्रगतीचा कळस गाठला आहे.

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता डेव्हिड स्ट्रॉस यांनी येशू ख्राईस्टवर लिहिताना असे म्हटलेले आहे, की ज्यांनी स्टीम इंजिनचा शोध लावला व इतरही अनेक शोध लावले त्यांना देवाच्या अस्तित्वाविषयी मत देण्याचा पूर्ण अधिकार आहे. एकोणिसाव्या शतकात तर ही चर्चा विविध स्तरांवर होऊ लागली.

असे असले तरी देवाच्या नावाचा गजर, त्याच्या प्रार्थनेचे शुभाशुभ फळ; तो परीक्षा घेतो, संकटसमयी मदत करतो, त्याने जर मदत केली नाही तर आपणच पाप केलेले असते व त्याचे फळ आपण भोगत असतो, तरीही तो पाठीराखा आहे व योग्य वेळी तोच आपल्याला तारून नेतो वगैरे वगैरे. लोक देवाच्या भजनी जास्तच लागलेले दिसतात. टीव्ही चॅनेल्सनी तर याबाबतीत चंग बांधलेला दिसतो. हिंदी, मराठी कोणतीही मालिका असो देवाच्या नावाचा गजर त्यात असतोच. सगळ्यात कहर म्हणजे घालीन लोटांगण असो, देवाची आरती असो किंवा एखादा श्लोक असो, त्यांचा पार्श्वसंगीत म्हणून सर्रास वापर केला जातो.

देवाचा हा अपमान आहे असे भक्तांना वाटत नाही का? मी वारंवार म्हटलेले आहे की देवाचा व्यापार वेगवेगळ्या तऱ्हांनी जाहिरातदार करत आहेत. उद्योग-पती करत आहेत. सिद्धिविनायकाचे मंदिर, तेथील आरत्या वेगवेगळ्या चॅनेलवरून गणपती उत्सवात, गणेश जयंतीला, चतुर्थीला वारंवार दाखवल्या जातात, नवस बोलले जातात व मालिकेत ते पुरे झालेले दाखवतात. म्हणजे देवाचा बाजार केवळ पंड्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही.

ताजी बातमी आहे की तिरुपतीचे ख्रिस्तीकरण (?) रोखण्यासाठी संतांची बैठक झाली. आंध्रप्रदेश सरकारने तिरुपती देवस्थानच्या कक्षेत येणारे तीन डोंगर त्यांच्याकडून काढून घेतले आहेत व तेथे नागरिकांना घरे बांधण्यास व वस्ती करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. ह्या भागाला तिरूमल टाऊनशीप असे नाव देण्यात आलेले आहे. सर्व धर्माच्या लोकांना तेथे वस्ती करता येईल. तशी परवानगी देण्यात आलेली आहे.

तिरुपती देवस्थानच्या संतांना हे मंजूर नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, सर्व-धर्मीयांची वस्ती झाली की त्यांची प्रार्थना-स्थळेही त्यांच्यापाठोपाठ येणार. त्यामुळे ह्या बैठकीत निर्णय घेण्यात आले, की १. राज्यसरकारने अलिकडे केलेला सर्व सात टेकड्या पवित्र नसल्याचा कायदा रद्द करावा. सात टेकड्यांची संपूर्ण जागा भगवान व्यंकटेश्वराची आहे; २. तिरूमल टेकड्यांवरील सर्व अहिंदूंना हलवण्यात यावे; ३. तिरूमल हे तीर्थक्षेत्र आहे. पर्यटनस्थळ नाही; ४. तिरूमल तिरुपती देवस्थानच्या शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांमधील अहिंदूंच्या कारवायांना सरकारने पाठिंबा देऊ नये; ५. तिरूमल तिरुपती देवस्थानचे सर्व 'अर्पण' धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांसाठी वापरले जावे.

ही बातमी वाचून मला मजा वाटली, कारण मी जेव्हा तिरुपतीला गेले होते तेव्हा आम्ही चक्क पैसे देऊन (अर्पून?) दर्शनाचा लाभ मिळवला होता. नाहीतर चार-चार दिवस रांगेत उभे राहावे लागते म्हणे!

अलिकडेच आणखीही एक बातमी होती की दहा लक्ष रुपये मंदिर ट्रस्टींना दिल्यास एक दिवस भगवान व्यंकटेश्वराच्या सहवासात काढता येईल. म्हणजे भगवान झोपला की आपण त्याच्याबरोबर झोपायचे, तो जेवला की आपण त्याच्याबरोबर जेवायचे. तो स्नान करत असताना आपण पण स्नान

**देवाबद्दलची जळमटे**

प्रेमला काळे याचे 'देव जाणिले कुणी?' हे पुस्तक वाचून संपवले. एवढा मोठा आणि कोणालाही न सुटलेला विषय त्यांनी एवढ्या छोट्या पुस्तकात समर्थपणे आणि सुसंगतपणे पेलला आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांनी जे लिहिले आहे ते यासारख्या न सुटलेल्या विषयाला पुरेपूर न्याय देणारे आणि विचारप्रक्षोभक आहे असे मला वाटते. किंबहुना, देवाबद्दल माझ्या स्वतःच्या मनात असलेली काही जळमटे त्यामुळे दूर झाली. लेखिकेच्या कौशल्याचे आणि यशाचे ते गमक आहे. त्याचबरोबर तिच्या चिकाटीचेही मला कौतुक वाटले. हा विषय अनेक वर्षे त्यांच्या मनात घोळत असावा. आणि त्यासाठी आवश्यक ती सामग्री त्या त्यांच्या प्रवासातून व प्रत्यक्ष अनुभवातून प्रदीर्घ काळ मिळवत असणार. हे पुस्तक वाचताना अनेक ठिकाणी जाणवले. या पुस्तकाद्वारे सर्वांसमोर अगदी सरळ सोपा भाषेत मांडण्यात त्या चांगल्याच यशस्वी झाल्या आहेत.

देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी माणसाने अनेक प्रकारचे बरेवाईट धर्म निर्माण केले. रिवाज आणि परंपरा निर्माण केल्या. परंतु त्यातले चांगले-वाईट समजून घेण्याचा प्रयत्न मात्र या साऱ्या प्रयत्नात दुर्लक्षला गेला ऐवढे जरी या पुस्तकाने वाचकांना कळले तरी खूप झाले!

**- माधवराव घोरपडे**

२ रॉयल होम, सानेवाडी, औंध, पुणे ४११ ००७




करायचे का हे समजले नाही. व्यंकटेश ब्रश करतो का? इतर नित्यकर्म? तेव्हाही आपण त्याच्याबरोबर असू? ह्या सर्वांचा काहीच खुलासा ह्या बातमीत केलेला नव्हता.

'माझ्या नावाखाली हिंदू-अहिंदू वाद उकरून काढा' असे ह्या देवस्थानाच्या ट्रस्टींना व्यंकटेशाने सांगितले असेल का? तसे नसेल तर ट्रस्टींना व्यंकटेशाची भीती वाटत नाही का? त्याने आपले डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिले तर? खल्लास!

ही बातमी वाचली तेव्हा माझ्या मनात असेही आले, ''व्यंकटेशा, कोठे आहेस तू?'' आपल्या नावाने तूच ह्या लोकांना शांतता नष्ट करण्याची परवानगी देतोस का? तुला तर सर्वच देव प्रिय असले पाहिजेत. तू विश्वात भरून आहेस. मुस्लिमांचा अल्ला आणि ख्रिश्चनांचा देव तुला भेटत असतीलच. दहशतीवर तुम्ही चर्चा करता का? तुमच्या नावाखाली चाललेल्या ह्या दहशतींना तुम्ही प्रोत्साहन देता का? देवहो, तुम्ही आहात की नाही?''

अमेरिकेतही अशीच घटना घडलेली वाचली. कॅलिफोर्नियातील एका मुस्लिमाने प्रेसिडेंट बुशला फर्मान सोडले आहे, की सर्व देशाने इस्लाम बनावे नाहीतर....

मजा म्हणजे ह्या अमेरिकन माणसाने नुकताच इस्लाम धर्म स्वीकारला आहे. त्यामुळे आनंदून जाऊन अल्लाह त्याला भेटला का? त्याने त्याला 'दहशत माजव' असा सल्ला दिला का? कुणास ठाऊक!

माझे मन पुन्हा देवाशी बोलण्याचा प्रयत्न करू लागले.

''खरंच देवा, मी तुला भजते, तुझी प्रार्थना करते, परंतु तू मला असा सल्ला कधीच दिलेला नाहीस. मग इतरांना तू असे खुनी सल्ले का देतोस? त्यांना आपल्या तावडीत का ठेवतोस? ते खूप पुण्यवान आहेत म्हणून? नाही देवा, तू असं काही करत असशील यावर माझा विश्वास नाही. तू असशील तर हे सर्व थांबवशील. पण तू बहुतेक नाहीसच; म्हणून हे सर्व घडत आहे.''

माझ्या मनात आणखी एक विचार आला. अगदी एकविसाव्या शतकात साजेसा विचार. शास्त्रज्ञ निरनिराळे शोध लावत आहेत. निरनिराळ्या गोष्टी, अगदी जनावरे आणि माणसेसुद्धा क्लोन बनवून तयार करत आहेत. देवालाही कदाचित तयार करतील 'रोबोदेव'. त्यांनी विचार केलेला हा रोबोदेव उद्याच्या जगाचा नियंता असेल. विचार करता करता मला झोप लागली असावी. कारण मी पाहत होते- प्रलयानंतर निर्माण झालेली नवी सृष्टी. खूप प्रगती झालेली आहे. इथे ऑर्डरप्रमाणे मुलगा किंवा मुलगी मिळेल. अशा पाट्या असलेली दुकाने मी पाहत होते.

पण मी तर शोधत होते देवाला.

एके ठिकाणी देवाच्या अस्तित्वा-विषयी चर्चा चालू होती. उत्खननात काही मंदिरे सापडलेली आहेत आणि त्यामध्ये अमिताभ बच्चन आणि सौरभ गांगुली हे देव उभे आहेत. हे देव कसे पुजले जात होते याविषयी चर्चा सुरू होती. काही म्हणत होते- शिव, विष्णू, गणपती, राम वगैरेही देव होते म्हणे. उत्खननात त्यांचीही मंदिरे सापडली आहेत, परंतु त्यांना कोणी पाहिलेले नाही. अमिताभ आणि सौरभ यांना मात्र अनेकांनी पाहिलेले होते. परंतु आता त्यांचे अस्तित्व आहे किंवा नाही ही शंकाच आहे. ते कदाचित नव्हतेच. काल्पनिक होते वगैरे वगैरे.

प्रत्यक्षात, ह्या नव्या सृष्टीत मला मंदिरे बांधलेली आढळली नाहीत. इतक्यात मला प्रार्थना करणाऱ्या लोकांचा समुदाय दिसला. उत्सुकतेने मी त्या ठिकाणी पोचले. ते सर्व लोक रोबोदेवाची प्रार्थना करत होते.

''My God, Robo Robo'' मी ओरडले आणि जागी झाले. स्वप्नातून जागी झाले खरी, परंतु विचारांनी डोके भंडावून गेले. झोप येईना. रोबोंचे राज्य उद्या खरेच आले तर? आज केवढी प्रगती होत आहे! अनेक कामे रोबो करत आहेत. उद्या रोबो वकील असतील, डॉक्टर असतील, इंजिनीयर असतील, ब्रोकर असतील पण त्यांचे निर्णय कोणाचे असतील? कधी ते चुकीचे ठरले तर? समजा, ऐंशी वर्षांचे एक वृद्ध आणि बारा वर्षांची एक मुलगी, दोघे अपघातात सापडली. तातडीचे उपचार झाले तर वृद्ध वाचण्याची शक्यता चाळीस टक्के व मुलीची शक्यता दहा टक्के आहेत. रोबो डॉक्टर काय निर्णय घेईल? अर्थात त्याच्या प्रोग्रामिंगवर त्याचा निर्णय अवलंबून असेल. अपघातात सापडलेल्या व्यक्तींपैकी ज्यांची वाचण्याची शक्यता जास्त त्यांना वाचवायचे असे प्रोग्रामिंग जर रोबो डॉक्टरचे असेल तर तो कोणाला वाचवेल? वृद्धाला की मुलीला? मला वाटते, वृद्धाला! कारण रोबो स्वत: विचार करत नाही. प्रोग्रामप्रमाणे वागतो.

पण मग रोबोदेवाचे काय? त्याचा 'प्रोग्राम' काय असेल व तो कोणी ठरवून दिलेला असेल? पुन्हा प्रश्नच. 'तो कोण आहे?' उत्तर - 'तो तूच आहेस' असे असेल का?

**(प्रेमला काळे यांच्या 'देव जाणिला कुणी' या पुस्तकातून. 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'तील हे पुस्तक केवळ पन्नास रुपयांत घरपोच मिळेल.)**

# आचार्य अत्रे : एक झुंजार पौरुष

## मं. गो. राजाध्यक्ष

एका बालकाचा सासवड येथे १३ ऑगस्ट १८९८ या दिवशी सकाळी सात वाजून पंचेचाळीस मिनिटांनी एका राहत्या घरात जन्म झाला. पुढे हे बालक अवघ्या महाराष्ट्राच्या प्रेमाला पात्र ठरेल याची त्यावेळी कोणाला कल्पनाही असणे अशक्य! शिवकालीन राघो बल्लाळ अत्रे यांच्या घराण्यात जन्म घेतलेले हे बालक म्हणजे पुढे महाराष्ट्रातील जनतेने ज्यांच्यावर अपरंपार प्रेम केले, ज्यांना आपल्या मनोमंदिरात अक्षरशः पूजले असे शतकातून एकदा जन्मणारे व्यक्तिमत्त्व, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे होत.

आचार्य अत्र्यांनी साहित्य, नाट्य, पत्रकारिता, शिक्षण... ज्या ज्या क्षेत्रात पाय टाकला तो त्या क्षेत्राला काबीज करण्यासाठीच! त्यांनी चित्रपटासारख्या बेभरवशी क्षेत्रातही चमत्कार करून दाखवला. साने गुरुजींच्या 'शामची आई'वर काढलेल्या चित्रपटास पहिलेच राष्ट्रपती सुवर्णपदक प्राप्त झाले! तसेच, त्यांच्या 'म. फुले' चित्रपटास रौप्यपदक मिळाले. त्यांना नाट्यक्षेत्रातही, गडकऱ्यांपासून प्रेरणा घेऊन, त्यांनी मराठी रंगभूमीला 'साष्टांग नमस्कार' घालून स्वतःचे असे खास पर्व निर्माण केले. त्यांनी 'तो मी नव्हेच', 'डॉ. लागू', 'बुवा तेथे काया' ही एकापेक्षा एक सरस नाटके लिहून मृतवत झालेल्या मराठी रंगभूमीला संजीवनी दिली.

आचार्य अत्र्यांच्या सहवासात अनेक व्यक्तिमत्त्वे आली. त्यांचे काहींशी सख्य जमले, तर त्यांनी काहींच्या न पटलेल्या विचारांवर हल्लेही चढवले. कित्येकांची नाराजी ओढवली. त्यांना सावरकरांविषयी पूर्ण आदर होता. त्यांना सावरकरांचे कर्तृत्व, थोरपणा, त्याग, देशप्रेम यांची पूर्ण जाणीव होती, पण नंतर, सावरकरांनी जेव्हा हिंदू राष्ट्राचा ध्यास धरला, तेव्हा अत्र्यांनी सावरकरांवरही टीका केली. तरीदेखील त्या



आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

दोघांच्या संबंधात बाधा आली नाही आणि पुण्यातील एक सभेत, अत्र्यांनी त्याना 'स्वातंत्र्यवीर' ही पदवी दिली. तसेच, सावरकरांनी अत्र्यांना 'आचार्य' ही उपाधी दिली.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हे आचार्य अत्र्यांच्या जीवनातील एक रोमहर्षक पर्व आहे. राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालाच्या आधारे, मुंबई ही द्विभाषिक ठेवण्याचे षडयंत्र रचले गेले होते. तेव्हा महाराष्ट्रातील जनता पेटून उठली. आचार्य अत्रे यांचा महाराष्ट्रवाद तर सर्वश्रुत आहे. आपल्या लेखणी व वाणीने त्यांनी सर्व महाराष्ट्र ढवळून काढला. त्यांचे 'नवयुग'मधील जळजळीत लिखाण प्रत्येक मराठी मनावर 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हा मंत्र कोरत होते. महाराष्ट्रातील गावोगावी, अगदी बेळगावपर्यंत अत्र्यांनी लाखा-लाखांच्या सभा घेऊन मराठी मने पेटवली. भांडवलदारांच्या साखळी वृत्तपत्रांकडून आंदोलनाची दखल घेतली जात नव्हती. त्यामुळे जनतेसमोर आवाज पोचत नव्हता. या एकाच कारणाने, मराठी माणसाचे रणशिंग फुंकण्यास मराठी माणसाचे वृत्तपत्र असावे या धारणेतून शिवतीर्थावरील एका जाहीर सभेत अत्र्यांनी आपल्या दैनिकाची घोषणी केली व सभेत हजर असलेल्या सेनापती बापटांनी तेथेल्या तेथे त्याचे 'मराठा' असे नामकरणही केले! आणि १५ नोव्हेंबर १९५६ रोजी जनसेवेचे कंकण बांधून मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी लढणारा 'दैनिक मराठा' सुरेश भटांचे 'मराठ्या, उचल तुझी तलवार!' हे स्फूर्तिगीत गात प्रसिद्ध झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या त्या लढ्यात जनतेच्या वतीने लढणारे आचार्य अत्रे हे झुंझार सेनानी होते. या लढ्यात आपल्या रक्ताचे अर्घ्य देऊन बळी पडलेल्या एकशेपाच हुतात्म्यांच्या स्मरणाने ते पेटून उठले, आणि त्यांच्या वाणीतून अन् लेखणीतून शब्दांचे पेटते निखारे बाहेर पडू लागले. मराठी माणसाचा रूद्रावतार पाहून केंद्र सरकार नमले व १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य जन्माला आले. या राज्याचे नाव 'मुंबई राज्य' असावे या मतावर काँग्रेस ठाम होती, पण आचार्य अत्र्यांनी इतिहासाचे अनेक दाखले देत. त्यास विरोध केला व 'महाराष्ट्र राज्य' हे नाव अस्तित्वात आले. संयुक्त महाराष्ट्र मुख्यतः आत्र्यांमुळे घडला हे सत्य होय; मग राजकारण काही असो.

आचार्य अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड होते. त्यांच्याच शब्दांत म्हणायचे तर 'गेल्या दहा हजार वर्षांत असा माणूस झाला नाही अन् पुढे होणार नाही.' त्यांच्या निसर्गदत्त व्यक्तिमत्त्वापुढे सर्वच खुजे भासत. थोडे, अल्प, जरा असे दारिद्र्य दाखवणारे शब्द त्यांच्या कोषात नव्हते. प्रचंड, लाखो, कोट्यवधी अशा श्रीमंती शब्दांमधूनच त्यांचे




विचार व्यक्त होत असत. ग.दि. माडगुळकर म्हणाले होते, की अत्र्यांना त्यांच्या मास्तरांनी 'बे एकंबे'चा पाढा कधी शिकवला नसावा; तो 'हजार एके हजार' असाच शिकवला असणार.

अशा या सव्यसाची व्यक्तिमत्त्वाचा ओढा अध्यात्माकडे होता. ते धार्मिक होते. पण त्यांच्याकडे अंधश्रद्धा नव्हती. त्यामुळेच त्यांच्या ओठी तुकोबा-ज्ञानेश्वर असत. त्यांनी संत गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांचा मानवता धर्म सतत जोपासला. त्यांचे जीवन त्याच भक्तिरसातून बहरले होते. त्यामुळेच 'देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर' अशी रचना त्यांच्याकडून झाली.

अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा सहवास मला काही वर्षे लाभला. सावरकरांच्या आत्मार्पणानंतर आचार्य अत्रे यांनी चौदा लेख लिहून त्यांना आदरांजली वाहिली होती. ते चौदा लेख साहित्यातील मानदंड ठरावेत असे होते. मी त्यावेळी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेत होतो. ते वर्ष होते १९६५. मी ते सर्व अग्रलेख स्वहस्ताक्षरात लिहून एखाद्या छापील पुस्तकाप्रमाणे मुखपृष्ठापासून प्रस्तावना, अनुक्रमाणिका, अर्पणपत्रिका त्यामध्ये समाविष्ट करून त्याला 'मृत्युंजय' हे शीर्षक दिले होते. मी ते पुस्तक आचार्य अत्रे यांना त्यांच्या 'आमोद हाऊस' या शिवतीर्थावरील निवासस्थानी जाऊन अर्पण केले. त्यांना ते इतके आवडले, की त्यांनी 'मराठा'मध्ये ते पुस्तक छापून माझा गौरव केला. मी त्या दिवसापासून अखेरपर्यंत त्यांच्या संपर्कात होतो.

आचार्य अत्र्यांचे १९६७ च्या निवडणुकांचे प्रचार साहित्य मी तयार केले होते. नुकत्याच निर्माण झालेल्या शिवसेनेने त्यांना प्रखर विरोध केला होता. मी त्यावेळी 'मराठा'मध्ये आचार्य अत्रे यांना विजयी करा या शीर्षकाखाली रोज जाहिरात मोहीम आखली होती. त्याच काळात शिवशक्तीच्या सुभाष हॉलमध्ये मीना पेठे यांच्या 'वासवदत्ता' नाटकाच्या मुहूर्ताचा समारंभ होता. त्या समारंभाचे अध्यक्ष होते आचार्य अत्रे. उपस्थितांमध्ये सुहासिनी मुळगावकर, सोपानदेव चौधरी, मंगेश पाडगावकर, शिरीष पै आदी मान्यवर होते. अत्र्यांनी नाटक या विषयावर बहुमोल मार्गदर्शन करून रशिया मध्ये स्टेजवर एकाच वेळी शेकडो माणसे आणून कशी भव्य नाटके करतात याचे विवेचन केले. समारंभ संपताच त्यांनी सर्वांना बाजूला असलेली आपली लायब्ररी दाखवण्यास नेले. त्यावेळी अत्रे यांनी अश्लील, बोभत्स लिहिणाऱ्यांविरूद्ध अग्रलेख लिहून वाभाडे काढले होते. त्यामध्ये 'वासूनाका'वाले भाऊ पाध्ये होते, 'बाई विना बुवा वाले' उद्धव शेळके होते. नुकतीच 'सत्यकथे'मध्ये लघवीकर कविता करणारे पाडगावकर होते. बोलता बोलता, अत्र्यांनी या विषयाला वाचा फोडली. त्यावर पाडगावकर म्हणाले, 'साहेब, तुम्हा टीका जरूर करा पण शिव्या का देता?'

त्यावर उसळून अत्रे म्हणाले, 'मी देणार! कारण मी प्रथम शिक्षक आहे. माझ्यासमोर कोणी मला सिगारेट ओढलेलीही चालत नाही. परवा रंगीबेरंगी चड्ड्यापड्ड्यांचा शर्ट घालून बोकड दाढीवाला एक तरुण माझ्या ऑफिसात आला अन् म्हणाला, 'आपण अत्रे का!' मी 'होय' म्हणताच तो म्हणाला, 'मी दिलीप चित्रे' असे म्हणून त्याने एक पुस्तक माझ्यासमोर टाकले. तो होता एक कवितासंग्रह. पहिलीच कविता होती, 'गांडुळाची आत्मकथा' मी म्हटले, 'छान! आपल्यापासूनच सुरुवात केलेली दिसते. अहो, हे लोक लिहीतात ते आईला वाचून दाखवू शकणार नाहीत ना बापाला. बायकोला दाखवले तर तिला ते कळणार नाही. मी देखील घाणेरडे लिहू शकतो. तुमच्यापेक्षाही लिहू शकतो. पण साहित्यात याला थारा नाही.'

आचार्य अत्र्यांनी आपल्या विनोदाला अतिशयोक्तीची जोड दिली होती. कित्येकदा, ते आपल्या विरोधकांना नामोहरम करण्यासाठी विनोदाचा वापर करत. ते आमदार असतेवेळी विरोधी पक्षाने एकदा सरकार विरूद्ध निदर्शने चालू केली होती. त्यामुळे पोलिसांनी निदर्शकांना मंत्रालयासमोर थोपवून धरले होते. एवढ्यात एक आलिशान पांढरी वातानुकूलित इंपाला गाडी तेथे येताच पहाऱ्यावरच्या पोलिसांनी नेहमीच्या सवयीने कडक सलाम ठोकून गाडी आत सोडली. आतून उतरले आचार्य अत्रे आणि त्यांनी घोषणा देण्यास प्रारंभ केला! त्यावेळी पोलिसांची एकच तारांबळ उडाली.

अत्र्यांचा १९६८ सालच्या १३ ऑगस्टला सत्तरावा वाढदिवस होता. सकाळी, आचार्य अत्रे व सुधाताई शिवशक्तीमधील निवासस्थानी आपल्या दिवाणखान्यात बंद गळ्याचा जोधपूरी सूट घालून, कुंकम तिळक लावून बसले होतो. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी सर्व थरांच्या लोकांची रिघ लागली होती. सायंकाळी रवींद्र नाट्य मंदिरात त्यांचा जाहीर सत्कार होता. अध्यक्षस्थानी होते बॅ. विठ्ठलराव

गाडगीळ. अत्र्यांचे गुणगान करताना विठ्ठलरावांनी म्हटले, 'अत्र्यांच्या सर्व गुणांमध्ये एकच दोष दाखवता येईल. तो म्हणजे त्यांची अतिशयोक्ती! आचार्य अत्रेंनी जेव्हा भाषणाला सुरुवात केली तेव्हा ते गंभीर आवाजात म्हणाले, 'आजच्या या समारंभाचे अध्यक्ष आणि माझे विद्वान व व्यासंगी मित्र काकासाहेब गाडगीळ यांचे चिरंजीव विठ्ठलराव...' एवढे बोलून ते काही क्षण स्तब्ध राहिले व हलकेच विठ्ठलरावांच्या दिशेने मान फिरवून त्यानी विचारले, काय हो! अतिशयोक्ती नाही ना झाली? त्यांच्या या उद्गाराबरोबर विठ्ठलरावांसहित सर्व सभागृह हशांच्या कल्लोळात बुडाले.

गोवा स्वतंत्र झाल्यानंतर आचार्य अत्रेंच्या सभेने पं. नेहरू यांच्या सभेचा विक्रम मोडला. भाऊसाहेब बांदोडकर यांना मुख्यमंत्रीपदावर बसवण्यात बॅ. नाथ पै व आचार्य अत्रे यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. गोवा महाराष्ट्रात यावा यासाठी या मंडळींचे जे प्रयत्न चालले होते त्यांना जॅक सिक्वेरा यांचा विरोध होता. त्या काळात बांदोडकरांनी अत्र्यांना काळ्या रंगाचे कुत्र्याचे एक पिल्लू भेट दिले होते. जॅक सिक्वेरा सतत त्या रूपात आपल्या नजरेसमोर असावे या हेतूने अत्र्यांनी त्याचे बारसे 'जॅक' असे केले होते. पुढे हा जॅक अत्र्यांचा विश्वासू सोबती बनला अन् एकदा, तो अत्र्यांच्या पायात अडखळला अन् अत्र्यांचा तोल जाऊन ते खाली पडले. तो १९६६ मधील तो रविवार होता.

हल्लीच दिवंगत झालेले जागतिक कीर्तीचे ऑर्थोपेडीक सर्जन डॉ. अरविंद बावडेकर त्यावेळी नवखे व तरुण होते. संध्याकाळी बाहेर जायच्या तयारीत असताना त्यांना शिरीष पै यांचा फोन आला. त्या म्हणाल्या, 'पप्पा पाय घसरून पडले आहेत. त्यांना उठता येत नाही. तरी लवकर या. डॉ. बावडेकरांचा अत्र्यांशी प्रत्यक्ष परिचय नव्हता, पण 'मराठा'च्या रूपाने घरोघर पोचलेल्या अत्र्यांचे ते भक्त होते. त्यांनी तत्काळ अत्र्यांच्या




घरी धाव घेतली व त्यांना आपल्या क्लिनिकमध्ये आणून एक्स-रे काढला. त्यांच्या मणक्याचे हाड मोडले होते. ते शस्त्रक्रिया करून जोडणे आवश्यक होते. अत्रे यांच्या फ्रॅक्चरची बातमी वाऱ्यासारखी पसरली अन् अनेकांचे फोन येऊ लागले. त्यात मुख्यमंत्री वसंतराव नाईकही होते. सर्वच जण त्यांच्या प्रकृतीविषयी अस्वस्थ होते. डॉ. बावडेकरांवर प्रचंड दडपण होते. कित्येकांनी त्यांना एवढ्या तरुण वयात एवढी मोठी जबाबदारी स्वीकारू नये असा सल्ला दिला. काही विपरीत घडले तर तुमचे पुढील भवितव्य धोक्यात येईल ही जाणीवही त्याना त्यांच्या गुरूंकडून देण्यात आली पण चित्रकार रवी परांजपे यांचे वडील व बावडेकरांचे बेळगावचे शिक्षक कृ. रा. परांजपे यांनी मात्र त्याना धीर दिला अन् उपचार करण्याचा सल्ला दिला. ते यशस्वी होणार याची खात्री दिली.

डॉ. बावडेकरांनी अत्र्यांची संपूर्ण केस अभ्यासली. मात्र शस्त्रक्रियेची जबाबदारी स्वीकारायची की नाही हे त्यांनी अत्रे कुटुंबीयांवर सोपवले, पण आचार्य अत्रे यांनी निक्षून सांगितले, की ही शस्त्रक्रिया बावडेकरांनीच करायची. पुढे शस्त्रक्रिया यशस्वी झाली. आतमध्ये स्टीलची पट्टी बसवण्यात आली होती. अत्रे त्यातून पूर्ण बरे झाले. वर्षभरातच सार्वत्रिक निवडणुका आल्या. संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या प्रचाराची सर्व जबाबदारी अत्र्यांवर होती. शिवतीर्थावर पुन्हा लाखालाखांच्या सभा गाजू लागल्या. पण अत्रे लोकसभेच्या त्या निवडणुकीत पराभूत झाले. निवडणुकीत एकही उमेदवार उभा न केलेल्या शिवसेनेने अत्र्यांविरूद्ध प्रचार केला. मराठी माणसासाठी, महाराष्ट्रासाठी आजन्म लढलेल्या या मराठी माणसाचा पराभव मराठी माणसाने केला!

आपल्या मंतरलेल्या जीवनात अत्रे यांनी सुखदुःखाचे गरिबी-श्रीमंतीचे अनेक चढउतार पाहिले. मराठी माणूस अन् महाराष्ट्रही त्यांची दैवते होती. शिवप्रभू, लो. टिळक, म. फुले, स्वा. सावरकर, डॉ. आंबेडकर यांचा महाराष्ट्र सर्वार्थाने परिपूर्ण व्हावा हे त्यांचे स्वप्न होते आणि ते साकार करण्यासाठी ते आजन्म झिजले. या बदल्यात शासनाने त्याना काही दिले नाही. नाही म्हणायला एकदा त्याना 'जे.पी.' (जस्टीस ऑफ द पीस) हा किताब दिला. अन् आचार्य अत्र्यांनी एक अग्रलेख लिहून त्याची टवाळी उडवली. राज्यकर्ते आले अन् गेले. त्यांची नावेही कोणाच्या ध्यानात राहिली नाहीत, पण जनतेच्या मनात पूजनीय असलेले आचार्य अत्रे मात्र अमर आहेत. अशा या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाने जगाचा निरोप घेतला तोही नेमका (१९६९ सालच्या जून महिन्याच्या) तेरा तारखेलाच!

**मं.गो. राजाध्यक्ष**
**३२, आकाशदर्शन,**
**सेंट अँथनी स्ट्रीट, वाकोला,**
**सांताक्रूझ (पूर्व) मुंबई ४०० ०५५**
**दूरध्वनी २६६५५०४७**

# शब्दबंधातील ठेव ही! : ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीची दीडशे वर्षे

**हेमंत शेट्ये**

शब्दकोश शब्दांचे अर्थ सांगतात आणि भाषेचा सांस्कृतिक विकास व समृद्धीही दर्शवतात. OXFORD ENGLISH DICTIONARY हा कोश इंग्रजी शब्दांच्या आणि शब्दकोशांच्या जगातील महाराजा म्हणून ओळखला जातो. विश्वसनीयता, उत्तम दर्जा आणि कोशशास्त्रातील अधिकार यांबाबतीत तो अखेरचा शब्द मानला जातो.

फिलॉलॉजिकल सोसायटी ऑफ लंडन या प्रख्यात भाषा-अभ्यासविषयक संस्थेतर्फे १८५७ साली एका बैठकीमध्ये या कोशाची बीजकल्पना मांडली गेली. काळ वेगाने बदलत होता. औद्योगिकीकरण वाढत होते. साम्राज्याचा विस्तार होत होता. आंतरखंडीय सांस्कृतिक देवाणघेवाण विविध प्रकारे सामाजिक जीवन व्यापू लागली होती. या सर्वांचा भाषेवर परिणाम होणे आणि भाषेकडून बदलत्या सांस्कृतिक जीवनाला सामोरे जाण्यासाठी लागणाऱ्या लवचीकतेची अपेक्षा करणे स्वाभाविक होते, परंतु त्यासाठी आवश्यक तत्कालीन इंग्रजी शब्दकोश हे अपुरे आणि अक्षम होते.

शेक्सपीयर, मिल्टन यांचा वारसा सांगणारी सातशे वर्षांची भाषा आणि तिचे शब्दभांडार यांचा बदलत्या काळाच्या संदर्भात पुनर्विचार करत, नवीन मांडणीत शब्दकोशाची निर्मिती करावी असा विचार संस्थेने मांडला. ही भाषा व शब्दसंपत्ती, काळानुरूप लवचीक, सक्षम व परिवर्तनीय असावी हे उद्दिष्ट ठरवले गेले. हे काम मोठे आहे याची संस्थेला कल्पना होती, परंतु कामाचा प्रत्यक्ष आवाका किती असू शकेल अथवा कामाच्या पूर्ततेसाठी नेमका किती वेळ लागेल याचा अंदाज संस्थेला नव्हता.

विचारानुसार, प्रस्तावित योजनेला मूर्त स्वरूप दिले गेले. कामाला आरंभ झाला. सुरुवात मंदगतीची होती. १८७९ मध्ये संस्थेने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसशी करार केला आणि जेम्स मरे या जाणकार कोशतज्ञाच्या मार्गदर्शनाखाली काम प्रत्यक्ष सुरू झाले.

प्रस्तावित शब्दकोश हा चार खंडांचा राहील. सुमारे सहा हजार चारशे पानांमध्ये इसवी सन १९५० पासून विद्यमान इंग्रजी भाषेतील शब्दप्रयोगांचा कालिक संदर्भासह समावेश राहील. या सर्व प्रकल्पास दहा वर्षे लागतील असा कयास होता. परंतु पहिल्या पाच वर्षांत कोशकार मरे आणि सहकारी पहिल्या वर्णाक्षराच्या 'ANT'पर्यंतच पोचू शकले. यामुळे शब्दकोशाची व्याप्ती खऱ्या अर्थाने संस्थेच्या ध्यानी आली आणि प्रकल्प-कालावधीचा विचार नव्याने करण्याची गरज स्पष्ट झाली.

**जिवंत दस्तावेज म्हणून ज्याकडे निर्देश करता येईल अशी एकमेवाद्वितीय संदर्भकृती, इंग्रजी भाषेच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक जिज्ञासूसाठी तिच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा समृद्ध वारसा घेऊन उपलब्ध आहे.**

इंग्रजीतील जुन्या शब्दांचे ससंदर्भ स्पष्टीकरण आणि नवे शब्द- त्यांचे अर्थ यांची सांगड मागील सात शतकांच्या भाषेच्या विकासाशी लावणे हे खरोखरीच जिकिरीचे काम होते. पहिला भाग १८८४ मध्ये प्रकाशित झाला आणि कामाची व्याप्ती व समग्रता स्पष्ट होऊ लागली. तीस वर्षांपूर्वी संस्थेने मांडलेली कल्पना आणि हाती असलेले कामाचे स्वरूप यांत महदंतर होते. कोशाचे हे काम पुढे चाळीस वर्षे चालू राहिले. कोशतज्ञ मरे सोबत नवनवीन संपादक व तज्ञांची मोठी फौज कामात व्यग्र होती. खंडामागून खंड प्रकाशित होत होते. अखेरचा खंड १९२८ च्या एप्रिल महिन्यात प्रकाशित झाला. पूर्ण शब्दकोश दहा खंडांत अवतरला. त्यातील एकूण नोंदी आणि शब्दप्रयोगांची संख्या होती चार लाख. दुर्दैवाने पूर्ण झालेला कोश पाहण्यास कोशकार मरे हयात नव्हते. त्यांचे निधन १९१५ सालीच झाले. त्यांनी आयुष्यातील छत्तीस वर्षे या कार्यास वाहिली होती. प्रकाशनविश्वातील ही एक अपूर्व घटना होती. या शब्दकोशाने इंग्रजी भाषेतील एका अधिकारपूर्ण संदर्भग्रंथाचे अद्वितीय स्थान निर्माण केले. इंग्रजी भाषेचे शब्दवैभव जणू सशक्त अशा दशभूजांनी मंडित होऊन उभे ठाकले.

भाषेच्या जिवंतपणाचे प्रमुख लक्षण म्हणजे तिची काळानुसार बदलण्याची क्षमता. काळाबरोबर येणारे बदल स्वीकारून नवनवे शब्द निर्माण करणे, स्वीकारणे, नवे अर्थ व संदर्भ यांचे सृजनशीलतेने, संवेदनशीलतेने स्वागत करणे होय. हे लक्षण नजरेसमोर ठेवल्यास जिवंत भाषेतील कोणताही शब्द-कोश हा पूर्ण अथवा अंतिम ठरू शकत नाही. पन्नास वर्षे उलटल्यावर या कोशाच्या संपादक मंडळाला वास्तवावर विचार करणे भाग पडले.

त्यापूर्वी, १९३३ मध्ये दोन वाढीव खंडांनी अद्ययावतता आणण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु दोन महायुद्धांदरम्यान आणि युद्धोत्तर काळात तंत्रविज्ञानासह ज्ञानाच्या सर्व विभागांत विशेषीकरण प्रचंड प्रमाणावर झाले. त्या सर्वांचे भाषेवर होणारे परिणाम, प्रभाव

आणि जाणवणारी तिची मर्यादा यांची दखल संपादकीय मंडळाची उपसमिती बारकाईने नोंदवत होती. कोशाची व्याप्ती व अद्ययावतता राखण्यासाठी १९५७ साली रॉबर्ट बर्चफिल्ड या संपादकाची नेमणूक विशेष करून केली गेली. कोशातील भाषेला अन्य खंडांतील इंग्रजी भाषाही सादप्रतिसाद देऊ लागली होती. युरोप खंडाबाहेरील मागणी व अपेक्षा यांचा विचार करणे आवश्यक झाले आणि १९७२ ते १९८६ या दरम्यान चार खंडांची पुरवणी मूळ कोशास जोडली गेली.

बर्चफिल्डचे काम आटोक्यात येत होते. त्या दरम्यान म्हणजे १९८२ साली या अजस्र कोशाची आधुनिक तंत्रज्ञानाशी म्हणजेच संगणकीय व्यवस्थेशी सांगड घालणे आवश्यक वाटू लागले. कोशाचे खंड प्रकाशित होण्यास लागणारा काळ आणि त्या दरम्यान वेगाने बदलणारा समाज व त्याची भाषा यांतील अंतर कमी करण्याची निकड भासू लागली. याची परिणती कोशमंडळाच्या धोरणात व्यक्त झाली. कोशप्रकाशन व संपादकीय संस्कारप्रक्रिया या कागदावरून संगणकीय माध्यमात याव्या ही दिशा ठरली. त्यामुळे अद्ययावतता राखणे सहज, सुलभ आणि त्वरित होणार होते. यासाठी १९८४ साली स्वतंत्र प्रकल्प मांडला गेला. प्रकल्पाच्या उद्दिष्टपूर्ततेसाठी पाच वर्षांचा कालावधी निश्चित केला गेला. हा प्रकल्प म्हणजे धाडसी पाऊल होते. ज्याला अर्धशतक लागले असे काम पाच वर्षांत संगणकीय माध्यमाच्या आधाराने अद्ययावत स्वरूपात मांडायचे होते.

जॉन सिम्पसन आणि एडमंड वैनर यांच्या कुशल नेतृत्वाखाली कोशतज्ज्ञांचे संघमंडळ परीक्षण, संपादन व दुरुस्ती या प्रचंड कामात व्यस्त होते. या प्रकल्पासाठी साडेतेरा लाख डॉलरची गुंतवणूक कोशमंडळाने केली. आजच्या रुपयांच्या भाषेत ही रक्कम साडेपंचावन्न कोटी होती. त्या काळातील संगणकीय प्रक्रियेतून प्रकाशन म्हणून अभूतपूर्व प्रकल्प अशी नोंद घेतली गेली. यासाठी सुमारे एकशेवीस टंकलेखक आणि पन्नास व्यावसायिक मुद्रित तपासनीस कार्यरत होते. जुन्या आवृत्तीत पाच हजार नवीन शब्दांची भर घालून व चार लाख व्याख्या मिळून एकूण शब्द संख्या झाली सहा कोटी. या समग्र व्यापाची परिणती प्रथमच निर्धारित वेळेत पूर्ण झालेल्या या महाकोशाच्या दुसऱ्या आवृत्तीत १९८९ साली झाली.

एकूण कोश बावीस हजार पृष्ठे व वीस भरीव खंडांत सिद्ध झाला. सत्तर ते पंच्याहत्तर किलो वजनाच्या या संदर्भ शब्दकोशास ग्रंथालयात विराजमान होण्यासाठी किमान चार फुटांची जागा शेल्फवर आवश्यक होती.

इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानास सामोरे जाण्यास १९९२ साली ऑक्सफर्ड शब्द-कोशाने पुन्हा नवा इतिहास घडवला व हा महाकोश सीडीच्या (तबकडी) रूपात प्रकाशित केला गेला. या माध्यमाने शब्दार्थ शोधण्याची प्रक्रियाच बदलून टाकली. काही सेकंदांत कोणताही शब्द, त्याचा अर्थ, उगम, इतिहास, उच्चारपद्धत, संदर्भ व कालक्रमे अवतरणे दाखल्याच्या समग्र माहितीसह नजरेच्या टप्प्यात येऊ लागला. 'इ' माध्यमाने त्याचे 'भार'दस्त स्वरूप बदलून 'ऐवज'दस्त रूप देऊ केले. आकारमानाकडून 'मूल्य'-मानाकडे प्रवास सुलभ झाला. संशोधकांसाठी भाषा-अभ्यासकांना शब्द संदर्भ 'हाताळणे' सहजसुलभ झाले आणि केवळ संशोधक जमातीशी मर्यादित न राहता हा कोश सर्वसामान्य जिज्ञासू वाचकांपर्यंत सहजतेने जाऊ शकला.

शब्दकोशातील शब्दभांडार व त्याचे स्वरूपही या नव्या आवृत्तीत सर्वांगांनी पालटले आहे. केवळ नव्या शब्दांची भर न टाकता सर्वच शब्दार्थ व त्यांची भाषा आजच्या भाषेशी ओळख देणारी ठेवली आहे. कोशतज्ज्ञ मरे आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या शब्दसाहित्याला १९२८ नंतर प्रथमच परिवर्तनाचा स्पर्श होत होता. संपूर्ण अंतरंग, बहिरंग, आमूलाग्र पालटत होते. शब्दकोश आणि आजचा वाचक यांत संवाद साधला गेला. कोशमंडळाचे दीडशे वर्षांपूर्वीचे पाहिलेले स्वप्न वास्तवात येत होते.

व्यावहारिक अंगाने, ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीचा हा व्याप तिच्या इतिहासात कोशमंडळाला कधीही नफादायी ठरलेला नाही. मात्र कोशमंडळ आणि प्रकाशक इंग्रजी भाषेच्या मूलगामी संशोधनासाठी आणि शाश्वत सांस्कृतिक विकासासाठी नेहमी प्रामाणिक आणि एकनिष्ठ राहिले. ही निष्ठा त्यांच्या कार्यातून प्रतीत होते; शिवाय, व्यावहारिक भाषेत सांगायचे तर मंडळाने आजही २२.५५ कोटींची स्वतंत्र तजवीज हा उपक्रम अद्ययावत ठेवण्यासाठी केली आहे.

सध्या या महाशब्दकोशाची ऑनलाईन आवृत्ती उपलब्ध असून दर तीन महिन्यांनी ती अद्ययावत ठेवली जाते. तंत्रज्ञानाच्या आधारासह आपल्या उद्दिष्टांशी एकनिष्ठ राहून फिलॉलॉजिकल सोसायटीने ज्या जिकिरीने आणि चिकाटीने १८५७ साली जे स्वप्न पाहिले ते केवळ प्रत्यक्षात आणले नाही तर भविष्यातही निरंतर राहील अशी व्यवस्था या कोशमंडळाने केली ही प्रकाशनविश्वातील केवळ कौतुकास्पद गोष्ट बनली नाही तर सर्वांसाठी मार्गदर्शक अशी दीपस्तंभ बनून दिमाखात राहिली.

जिवंत दस्तावेज म्हणून ज्याकडे निर्देश करता येईल अशी एकमेवाद्वितीय संदर्भकृती इंग्रजी भाषेच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक जिज्ञासूसाठी तिच्या दीडशे वर्षाच्या इतिहासाचा समृद्ध वारसा घेऊन उपलब्ध आहे. इंग्रजी संस्कृतीचा, ब्रिटिशांच्या राष्ट्राभिमानाचा तो अविभाज्य भाग बनला आहे आणि पर्यायाने, त्याने जगाच्या सांस्कृतिक वारशातही महत्त्वाचे स्थान मिळवले आहे.

**हेमंत शेट्ये**

**दूरध्वनी ९८१९६२१८१३**

**ई-मेल :** hemant24th@gmail.com

# माणसाला मरण नसतं तर?

## कृ. ना. कुडाळकर

जो जन्माला येतो त्याला मरण अटळ; पण हे मरण केव्हा कुठे व कसं येणार ते कोणालाही माहीत नसतं. मरण म्हणजे सर्व संपलं. तेव्हा आपलं सर्व इतक्यातच संपू नये ही प्रत्येकाची मनोमन इच्छा. हे 'इतक्यातच' प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत वेगवेगळं असतं. लेखकमंडळी म्हणणार, आम्हाला साहित्य अॅकेडमीकडून पुरस्कार मिळेपर्यंत तरी जगू दे. तमाम तरुण मंडळी म्हणणार आमच्या हातून काहीतरी होईपर्यंत तरी आम्हाला जगू दे. असं कोणी काही, कोणी काही मनात घोळवत असणार.

इथून रूढ शब्दांत प्रार्थना या कल्पनेचा जन्म झाला. परत प्रश्न आला. प्रार्थना, पण कोणाची करायची? अर्थात ज्यात मला मारण्याची शक्ती आहे त्या जगन्नियंत्यावी. प्रार्थना, जगन्नियंता ईश्वर या संकल्पनांचा उगम, मरण अटळ आहे या भीतीमधून झाला. शिवाय, मरणाच्या भीतीने माणसाच्या व्यवहाराला वेळेचं बंधन पाळण्याची एक बाजू आली आणि हे सर्व सृष्टिनियमाप्रमाणे चालू असताना अचानक एक आकाशवाणी झाली. 'ह्या पृथ्वीतलावर मनुष्यप्राण्याला यापुढे मरण नाही!'

प्रत्येकजण आपण इतक्यातच नाही तर केव्हाच संपणार नाही म्हणून हर्षभरित झाला. त्याच्यावरील वेळेची बंधनं पूर्णपणे सैल झाली.

आपल्याला जे काही मिळवायचं आहे त्याकरता कोणाची प्रार्थना करायची गरज उरली नाही. म्हणजे प्रार्थना, ईश्वर या कल्पनांचेच पृथ्वीतलावरून उच्चाटन झाले. मनुष्याच्या आचारविचारांवर ईश्वर या कल्पनेमुळे जी नैतिक बंधने होती ती मुळापासून निपटली गेली. त्यामुळे नीती-अनितीच्या आधीच्या कल्पनांना जोरदार धक्का बसला. सामाजिक मूल्ये बदलून गेली. (अर्थात त्याआधीच्या जगात ईश्वर ही संकल्पना जारी असतानासुद्धा बोफोर्स, हर्षद-स्कॅम, युरिया-स्कॅम अशासारखे मती गुंगवणारे पैशांचे घोटाळे बेमुर्वतखोरपणे सर्रास चालू होते ही गोष्ट अलाहिदा.)

मरण नाही या कल्पनेने बेहोष झालेल्या मनुष्याला हळुहळू कळून चुकलं की मरण नसलं तरी आजार, अपघात, रोगराई, अपंगत्व, वृद्धत्व, मानसिक तणाव हे किंवा ह्यांसारखे मनुष्याला सतावणारे इतर व्यवहार चालूच राहणार. कॅन्सर, संधिवात, कंपवात यांसारखे एकाहून एक क्लेशदायक, दुर्धर रोग झालेली मंडळी, आपण लवकरच मरू व यातनांतून मुक्त होऊ या आशेवर जगायची, पण मरण नाही म्हटल्यावर त्यांचे हाल अनंतकाळ चालू राहणार. नुसती कल्पनाच महाभयंकर!

लॉरीने धडक मारल्यावर त्या माणसाचं काय होणार? तो जिवंत राहणार म्हणजे नक्की काय? पशुधन, भाजीपाला, धान्य इत्यादी सध्याचं उत्पादन तितकंच राहील असं धरलं तरी हे उत्पादन वाढलेल्या मनुष्यसंख्येस कसं काय पुरणार?

मग माणूस माणसालाच खाणार की काय? पण जो खाल्ला जाईल त्याला तर मरण नाही. मग त्याचा सांगाडा जिवंत राहणार की काय. म्हणजे नक्की काय होईल त्याचं? तो सांगाडा इकडे तिकडे फिरत राहणार? तसं असलं तर जगण्यासाठी तो काय खाणार आणि कसे खाणार?

पार्लमेण्टच्या खासदारांची संख्या कमीत कमी दुप्पट झाली, म्हणून जागेच्या अभावी पार्लमेण्टच्या शाळांसारख्या दोन पाळ्या सुरू झाल्या. शिक्षणासारख्या खत्रूड क्षेत्रासारखी आपली गत झाली ह्याची मनस्वी चीड येऊन, खासदारांनी 'खासदार' व्हायचं असेल तर शिक्षणाची बिलकुल गरज नाही' अशी घटनेत तरतूद करून घेतली. नाहीतरी ते शिक्षण, त्यांच्या घोटाळे करून पैसे करण्याच्या धंद्यात उपयोगी पडत नव्हतेच!

एक ना अनेक. पण मुख्य म्हणजे गँगवॉरवाल्या टोळ्यांचं काय होईल? प्रतिस्पर्ध्याला गोळी मारल्याचं समाधान तो फारतर घेऊ शकेल, परंतु गोळी मेंदूतून गेली काय किंवा हृदय आरपार छेदून गेली काय? तो मरणार नाही. अतएव, एक भाई दुसऱ्या भाईच्या गोळीला घाबरणार नाही. एकंदर गँगवार ही एक फिजूल बात होऊ जाईल.

खंडणी वसूल करणाऱ्यांची, जुन्या बिल्डिंगमधल्या भाडेकरूंना धमक्या देणाऱ्या बिल्डरांची भलतीच पंचाईत होणार. मरणाची भीती नाही म्हणून त्या भाडेकरूंवर किंवा दुकानदारांवर धमक्यांचा काहीच परिणाम होणार नाही.

परिणामी, ही सर्व भाईमंडळी, खंडणीवाले, बिल्डर, घोटाळेफेमस खासदार, मंत्री एकदम हवालदिल झाले. बरं, सत्यनारायण करावा तरी पंचाईत, कारण ईश्वर पण नाही पूजेकरता!

तीच गोष्ट आंतरराष्ट्रीय पातळीवर. सद्दामच्या इराकवर भले पेट्रियट मिसाईल्स टाका किंवा इतर काही टाका. त्या बाजूला मरण नाही म्हटल्यावर अमेरिकेची पंचाईत! मरण नाही म्हणून लढायांना अर्थ उरणार नाही. म्हणजे मग शस्त्रास्त्रांना मागणी बंद. म्हणजे ते कारखाने बंद. म्हणजे लोकांची उपासमार आणि उपासमारीमुळे मरण पण नाही! परिणामी, अमेरिका आणि शस्त्रं पुरवणारी इतर राष्ट्रं शांततेचे ठराव करूनसुद्धा बेचैन झाली, हताश झाली.

हा सर्व प्रकार पाहून मोठमोठ्या राष्ट्रांतून, विशेषतः अमेरिकेतून माणसाला मरण कसं आणता येईल याकरता उच्च पातळीवर संशोधन सुरू होईल. (ह्याआधी

ही सर्व राष्ट्रं मरण कसं येऊ नये किंवा कसं लांबवता येईल या संशोधनात होती.

सर्व राष्ट्रे युनोमध्ये मरण आणण्याकरता ठराव करण्यामागे लागली. युनोत का, तर प्रार्थना, ईश्वर या संकल्पना पार नष्ट झाल्या होत्या. मग शरण कोणाला जायचे. शिवाय, नाहीतरी ठराव करण्याव्यतिरिक्त त्या युनोचा उपयोग काय होता म्हणा?

सर्वत्र भयानक अंधःकाराचे राज्य पसरले. जो तो त्यात कुठेतरी ती एखादी स्मितरेषा दिसते काय म्हणून आकाश धुंडाळू लागला आणि सरतेशेवटी, एका संशोधक शास्त्रज्ञाला जुन्या अवशेषात ईश्वर म्हणून पूर्वी कोणी शक्ती होती हे एकदाचे आढळले.

झाले. लगेच रॉकफेलर फाऊण्डेशन फोर्ड फाऊण्डेशन, जर्मन फाऊण्डेशन, फ्रेंच फाऊण्डेशन, स्कॅण्डिनेव्हिअन फाऊण्डेशन या सर्व मोठमोठ्या राष्ट्रीय स्तरांवरील संस्थांनी स्कॉलरशिप जाहीर केल्या. विषय 'ईश्वर ही काय शक्ती होती. त्या शक्तीकडे कसे पोचायचे. प्रार्थना? छे, ती नंतर. आधी ईश्वर शोधा आणि संशोधन जोरात सुरू झाले.

आपल्या ओव्हल ऑफिसमध्ये फेऱ्या मारून जॉर्ज बुश थकला. तिथे बुश थकला म्हणून १०, डाऊनिंग स्ट्रीटमध्ये जॉर्ज ब्राऊन थकला. बाकीचे सर्व प्रेसिडेण्ट, पंतप्रधान आधीच आडवे झाले होते.

आणि अखेर तमाम मनुष्यजातीने हुश्य केले. बातमी आली. भारतातील दक्षिणेतील येळीगुट्टी गावातील कोणी एक शेतकरी वेण्णू गोपाळ सुब्रमण्यम पिल्ले यांनी ईश्वराचा शोध लागला. त्याने सर्व पुराणे, वेद पालथे घातले आणि त्यातून म्हणे, ईश्वराचा शोध लागला त्याला.

भारताने शोध लावला आणि जगाच्या इतिहासात सोनेरी अक्षराने लिहून ठेवावी अशी दोन वक्तव्ये जाहीर झाली.

जॉर्ज बुश साश्रुनयनाने म्हणाले, 'केवढा मोठा हा शोध, केवढा हा भारत महान, आता त्याने एन. पी. टी. वा सी. टी. बी. टी.वर सही नाही केली तरी चालेल. आम्ही त्यांना डिफेन्ससाठी युरेनियम पुरवणार. ह्यापुढे पाकिस्तानला एफ-१६ विमान बंद. आता, आम्ही वेण्णू गोपाळचा सर्व जगातर्फे भव्य सत्कार करणार. अनायासे अटलांटाचा स्टेडियम आहेच. सर्व भारतीयांना त्या समारंभाला प्रेमाने व अगत्याने येण्याचे मी जगातर्फे आमंत्रण देतो.'

दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे भारताच्या एका शेतकरी सुपुत्राने परराष्ट्र वर्तुळात अमेरिकेवर मात केल्यामुळे तमाम मंत्रिमंडळामध्ये हर्षवायू होऊन त्यांनी दिल्लीत एक यज्ञ केला. यज्ञाचे पौरोहित्य अर्थात तिहार जेलमधून स्पेशल मर्सिडिज-मधून आणून चंद्रास्वामीला करण्यास सांगितले. त्याआधी सर्वोच्च न्यायालयातर्फे चंद्रास्वामीला स्पेशल जामिनावर सोडण्याची सर्वोच्च व्ही.व्ही.आय.पी. ने सर्वोत्तम काळजी घेतली होती.

जॉर्ज बुशच्या त्या वक्तव्यापेक्षा अधिक हेलावणारे भाष्य जनरल मुर्शरफ यांनी केले. ते म्हणाले, 'हा शोध भारतच लावू शकेल याबद्दल आम्हाला खात्री होती. काही झाले तरी तो आमचा बडा भाईच.' आणि त्यापुढे जाऊन आवंढे गिळत गिळत ते म्हणाले. 'मेरे बडे भाई, तुम्ही पाकव्याप्त काश्मिरच का, संपूर्ण काश्मिर, एवढेच नव्हे तर खुद्द पाकिस्तानसुद्धा घ्या. नाहीतरी आम्हाला ते पेलवत नाहीच.' या वाक्याला पाक पार्लमेण्टमधील सर्व खासदारांसकट तमाम मुल्लांनी तिथल्या तिथे नमाझ पढून 'भारत एक महान देश' अशा घोषणा देत आपला पाठिंबा दर्शवला.

यानंतर वेण्णू गोपाळचा अटलांटा येथे भव्य सत्कार झाला.

भगवी कफनी व भगवा फेटा घालून वेण्णू गोपाळने सुरुवात केली, 'माझ्या बंधूंनो आणि माझ्या भगिनींनो'

टाळ्यांच्या कडकडाटाने सगळा आसमंत दुमदुमून गेला. एकशेबारा वर्षांच्या एका अमेरिकन माणसाने आठवण करून दिली. 'सुमारे शंभर वर्षांपूर्वी शिकागोला असाच कडकडाट झाला होता. त्यानंतर हाच.'

जनरल मुर्शरफ यांना भावनावेग आवरेना. त्यांनी न राहवून शेजारीच बसलेल्या अमेरिकेच्या प्रथम महिला मॅडम लॉरांना आपली बेगम समजून स्फुंदत स्फुंदत मिठी मारली. 'जनरलसाहेबांच्या डोळ्यांवर अश्रुपूरामुळे ढग आले असणार व टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटामुळे आपण कोठे आहोत ह्याचं त्यांचे भान हरपले असणार' असे बेगमसाहेबांनी जाहीर वक्तव्य करून पाकिस्तानी स्त्री किती उदार असू शकते ह्याचे प्रात्यक्षिक जगाला घडवले.

आणि बुशसाहेब मॅडम लॉरांच्या खांद्यावर डोके ठेवून स्फुंदत होते. हे सर्व काय होत आहे? मॅडम लॉरांनी त्यांची समजूत घातली. ''जॉर्ज, घाबरू नकोस. भारत फक्त आजच्यापुरता महान आहे. काही झाले तरी अमेरिका ही नेहमीच महान असणार.'' तेव्हा कुठे बुशसाहेबांचे समाधान होऊन त्यांच्या चेहऱ्यावर किंचित हसू उमटले.

आणि वेदघोषाच्या गंभीर आवाजात जमलेल्या भारतीयांनी, सर्वांच्या वतीने ईश्वराचे स्मरण व स्तुतिपाठ सुरू केले.

त्वमेवं प्रत्यक्षं तत्वमसि,
त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि,
सर्व जगदिदं त्वयि लयमेष्यति,
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति,

खूप कालावधीनंतर स्तुतिपाठ
ऐकून ईश्वराला समाधान वाटले
आणि आकाशवाणी झाली,

मरणं प्रकृतिः शरीराणाम्! मरणं प्रकृतिः शरीराणाम्! मरणं प्रकृतिः शरीराणाम्!

तथास्तु!

**कृ. ना. कुडाळकर**
**३५, वेस्ट ॲव्हेन्यु, सांताक्रूज वेस्ट,**
**मुंबई ४०० ०५४**
**दूरध्वनी २६४६१८१८**

# ‘उंची’, कवी दत्ता हलसगीकरांची!

काही वर्षांपूर्वी जांभूळपाड्याच्या - वृद्धाश्रमात (कार्यक्रमानिमित्ताने) जाण्याचा योग आला होता. वृद्धाश्रमाच्या आधी, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास/शिक्षण साहाय्य पुरवणारी एक संस्था दिसली. त्या संस्थेच्या अंगणात एका मोठ्या फलकावर एक कविता, तैलरंगात लिहिली होती. जरा थांबून कविता वाचली, ती अशी होती.



**उंची**

ज्यांची बाग फुलून आली। त्यांनी दोन फुले द्यावीत
ज्यांचे सूर जुळून आले। त्यांनी दोम गाणी द्यावीत.
ज्यांच्या अंगणात झुकले ढग। त्यांनी ओंजळ पाणी द्यावे
आपले श्रीमंत हृदय त्यांनी। रिते करून भरून घ्यावे.
आभाळाएवढी ज्यांची उंची। त्यांनी थोडे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले। त्यांना थोडे उचलून घ्यावे.

कवितेखाली, कवीचे नाव होते- दत्ता हलसगीकर.

शांतपणे, गेली पन्नास-बावन्न वर्षे आपल्या काव्यसाधनेत मग्न असलेले कविवर्य दत्ता हलसगीकर ७ ऑगस्ट २००८ रोजी पंचाहत्तरीत प्रवेश करते झाले. त्यानिमित्ताने त्यांचे अभीष्टचिंतन. ‘रुची’मधील ‘कवितेच्या व्यासपीठा’ने जे काही मित्र जोडले गेले, त्यांतले दत्ताजी एक. अलिकडेच, त्यांनी एका पत्रात लिहिले होते. ‘‘फेब्रुवारीत माझी ‘बायपास सर्जरी’ झाली. आता नव्यानं जगावं असा उत्साह मिळाला आहे.’’

‘आषाढघन’, ‘उन्हातल्या चांदण्यात’ (गदिमा पुरस्कार), ‘चाहूल वसंताची’ (कुसुमाग्रज-पुरस्कार), ‘सहवास’, ‘करुणाघन’ हे दत्ता हलसगीकरांचे संग्रह. त्याशिवाय बालकवितांचे चार संग्रह. ललित लेखनाची तीन पुस्तके... अशी ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे.

सुरेश भटांनी त्यांच्या कवितेबाबत लिहिले आहे. ‘स्वच्छ व प्रांजळ मराठीत इतकी उत्कट कविता लिहिणारे कवी सहसा वाचनात येत नाहीत. दत्ताजींची कविता एकदम गळ्यात हात घालत नाही, तरीही तुमच्या हृदयात केव्हा शिरते - हेही कळत नाही.

**- सदानंद डबीर**

# साहित्याच्या अनुवादामुळे वैश्विक अनुभूतीचा साक्षात्कार होतो – प्रा. एकनाथ धोंडे

बुलडाणा, ‘‘विविध देशांतील तथा विविध भाषांतील साहित्याचे मराठी भाषेत अनुवाद झाल्यामुळे वाचकाला वैश्विक अनुभूतीचा साक्षात्कार होतो. जर्मन भाषेतील कवींच्या कविता अनुवादाच्या माध्यमातून भगवान ठग यांनी मराठी भाषेत आणल्यामुळे मराठी काव्यक्षेत्राची समृद्धी वाढली आहे.’’ असे प्रतिपादन ‘आधुनिक जर्मन कविता’ या अनुवादित कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ कवी प्रा. एकनाथ धांडे यांनी केले. प्रगती सार्वजनिक वाचनालयात आयोजित या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. सुधाकर साळी होते तर प्रमुख अतिथी म्हणून मलकापूरचे एस.डी.ओ. तथा कवी रामचंद्र मोरे, भास्करराव देशपांडे, ग्रामीण कवी तुळशीराम मापारी उपस्थित होते.

आरंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संतश्रेष्ठ तुकाराम आणि महाकवी वॉल्ट व्हिटमन यांच्या प्रतिमांचे पूजन झाल्यानंतर ‘निशाणी डावा अंगठा’ या कादंबरीवर निर्माते पुरुषोत्तम बेर्डे चित्रपट निर्मिती करत असल्याबद्दल कादंबरीकार रमेश इंगळे यांचा भावपूर्ण सत्कार भगवान ठग यांनी केला. तर बुलडाण्याच्या वाङमयीन इतिहासात ‘पीएच.डी.’चा विषय होण्याचा सन्मान लाभल्याबद्दल भगवान ठग यांचा कथाकार कडुबा बनसोडे यांनी सत्कार केला. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. सुधाकर साळी म्हणाले, की ‘‘जर्मनी या देशातील कवींच्या कवितांच्या माध्यमातून काव्यरसिकाला तेथील लोक, संस्कृती, पर्यावरण, युद्धजन्य परिस्थिती आणि जर्मन माणसाची मानसिकता कळते. या संग्रहामुळे जर्मनी आणि मराठी भाषिकांमध्ये जवळीक साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले आहे.

## तुका म्हणे साहित्य पुरस्कार

‘तुका म्हणे’ या वाङमयीन चळवळीच्या माध्यमातून दरवर्षी देण्यात येत असलेल्या महाराष्ट्रातील ‘तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००८’साठी १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीत प्रकाशित झालेली मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांतील कथा, कविता, नाटक, कादंबरी, समीक्षा, अनुवादित अशी सर्व प्रकारची पुस्तके; त्याचबरोबर मराठी भाषेतून अन्य कोणत्याही भारतीय व जगातील भाषेत अनुवादित झालेली पुस्तके; तसेच जगातील विविध भाषांतून मराठी भाषेत अनुवादित झालेली पुस्तके (दोन प्रतीसह) लेखक अथवा प्रकाशकांकडून मागवण्यात आली आहेत. पुरस्कारांसाठी ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत पुस्तके भगवान ठग, संयोजक, तुका म्हणे साहित्य पुरस्कार समिती, केशवनगर, बुलडाणा ४४३ ००१ (महाराष्ट्र) या पत्त्यावर पाठवायची आहेत.

# ‘सशक्त’ की ‘कसदार’?

## जयवंत चुनेकर

**महत्त्व ‘डेट-लाईन’चे सुद्धा :**

‘दैनिका’ची मांडणी करताना अगदी पहिल्या पानावरच्या मजकुरापासून दक्ष राहणे आवश्यक असते, असे गृहीतच धरले पाहिजे. एखादी छोटी बातमीसुद्धा कालांतराने एखाद्या अभ्यासकाला महत्त्वाचा संदर्भ पुरवू शकते. संदर्भाचा मुद्दा लक्षात घेतला, की मग वर्तमानपत्राच्या तारखेलाही महत्त्व येते. ह्यात गफलत झाली नि ती लक्षात आल्यावर दुरुस्त झाली नाही, तर त्या संदर्भाचा वापर करणाऱ्याची काय पंचाईत होईल, याची कल्पना करणे सहज शक्य आहे.

वृत्तपत्राच्या नावाखाली - म्हणजे वृत्तपत्र जगातल्या परिभाषेत ‘ब्रॅण्ड-नेम’ समाविष्ट असणाऱ्या ‘मास्कहेड’मध्ये वृत्तपत्राचे नाव, तारीख, अंक, क्रमांक आदी तपशील असतो. त्यामध्ये तारखेचा संदर्भ ‘डेट लाइन’ - असतो. ‘लोकमत’च्या **२ एप्रिल** **२००८**च्या अंकात त्या ठिकाणी **२ मार्च** **२००८** ही तारीख पडली आहे. आतल्या पृष्ठावर मात्र जेथे जेथे हा संदर्भ येतो, तेथे तो बरोबर, म्हणजे २ एप्रिल २००८ असाच आहे. ही चूक संबंधितांच्या लक्षात आल्याची खूण पटली नाही. कारण ३ एप्रिलच्या अंकात त्याबाबत खुलासा आढळला नाही.

वृत्तपत्रातील संदर्भाधारे इतिहास किंवा पूर्वकालीन विषयाचे लेखन करणारा लेखक अशा गफलतीमुळे संभ्रमात पडू शकेल.

**मोठ्या, दीर्घ वाक्यरचनेचे ओझे**

बातमी लिहिताना सुटसुटीत, छोट्या वाक्यांत ती लिहिली गेली, तर बातमीच्या वाक्यरचनेचा तोल सांभाळताना कसरत करावी लागत नाही. ह्या सूत्राकडे दुर्लक्ष झाले तर त्या वाक्यात संदिग्धता येतेच; त्याबरोबर वाक्याचा तोलही बिघडतो.

‘सकाळ’च्या १ एप्रिल २००८ च्या अंकात ‘विधिमंडळ अधिवेशन - दिवस गोंधळाचा’ या शीर्षकाखाली (पृष्ठ १) प्रसिद्ध झालेली बातमी हे याचं उदाहरण आहे. वाक्य असे आहे :

‘या चर्चेला सुरुवात करताना भाजपचे गोपीनाथ मुंडे यांनी छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ‘जीव्हीके’ कंपनीच्या मोठमोठाल्या फलकांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत (केली.) महाराजांच्या नावाने असलेल्या (महाराजांचे नाव दिलेल्या) विमानतळावर ‘जीव्हीके’चे नाव मोठे आणि शिवाजी महाराजांचे नाव अत्यंत छोट्या अक्षरांत लिहिले आहे. (असे त्यानी निदर्शनास आणले.) छत्रपतींचा हा अवमान असून राज्य सरकारने तत्काळ हे फलक काढावेत, अशी(ही) मागणी (पुढे) मुंडे यांनी केली.’

हे वाक्य दीर्घ आहे. कंसात दर्शवल्या-प्रमाणे त्या त्या ठिकाणी बदल केले, तर या एकाच दीर्घ वाक्यातला आशय अधिक सुगम होतो हे लक्षात येईल. वाक्य दीर्घ करण्याच्या प्रयत्नात त्याचा तोल कसा ढळला आहे ते पाहण्यासारखे आहे. ‘या चर्चेला’ या शब्दांनी सुरू होणारे वाक्य ‘अक्षरात लिहिले आहे’ इथे संपते. मुळात मुंडे ह्यांनी त्यांची तीव्र नाराजी व्यक्त केली आणि नाराजीच्या कारणावर कारवाई करावी, असे त्यांना पुढे म्हणायचे आहे. मात्र या वाक्यरचनेत मुंडे यांनी नाराजी व्यक्त केली, पण तिच्या कारणाचा रोख स्वतः मुंडे यांच्याकडेच वळला आहे! ‘नाराजी व्यक्त करत’ या अपूर्ण क्रियापद-रूपाच्या शब्दयोजनेमुळे पुढच्या वाक्याचा रोख मुंडे यांच्याकडे वळतो, याचे अवधान, बातमी तयार करणाऱ्याला राहिलेले नाही आणि पुढच्या वाक्यांशाच्या अखेरीस क्रियापदाचे पूर्ण रूप आल्याने प्राप्त वाक्यरचनेत नेमका उलटा अर्थ दर्शवला गेला! वास्तविक ‘महाराजांचे नाव छोट्या अक्षरांत लिहिण्यात आल्याचे’ मुंडे यांना प्रतिपादन करायचे आहे!

**आणखी दोन नमुने**

‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ५ एप्रिल २००८च्या अंकातील ‘स्टेट बँक ऑफ इंडियाने घडवलं १००० मुलींचं उज्ज्वल भविष्य’ या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेली बातमी हेही याच दोषाची बाधा झालेले उदाहरण. हे वाक्य असे आहे :

‘ज्या लहान मुलीला शिक्षण घेण्याची इच्छा आहे पण तिचे पालक आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने तिच्या शिक्षणासाठी पैसे खर्च करू शकत नाही आणि या आर्थिक कारणामुळे शिक्षणापासून वंचित रहाव्या लागणाऱ्या मुलीला एसबीआयच्या प्रत्येक शाखेने त्यांच्या विभागातील मुली दत्तक घेतल्या होत्या.’

ह्या वाक्याची रचना किती सैलपणे केली आहे ते लक्षात घेण्यासारखे आहे. वाक्याचा डौल पूर्णपणे बिघडलेली ही रचना आहे. नामाच्या एकवचनी रूपात (ज्या लहान मुलीला...) सुरू होणारे हे वाक्य अनेकवचनी रूपात संपवले आहे. (मुली दत्तक घेतल्या होत्या.) एकच एक मोठे वाक्य करण्याच्या नादात हा ‘वचनभंगाचा’ गुंता झाला आहे! शिवाय, ‘मुलीला’ या नामपदामागे ‘लहान’हे विशेषण वापरण्याने बातमीत संदिग्धता येते. ‘लहान’ म्हणजे नेमकी किती ‘लहान’? ह्या रचनेमुळे निश्चित अर्थबोध होत नाहीच. शिवाय ‘वंचित रहाव्या लागणाऱ्या मुलीला’ ह्या पदांमधील मुलीला हे एकवचनी कर्मपद वापरल्यावर वाक्याचा शेवट मात्र ‘दत्तक

घेतल्या होत्या' असा, त्याच कर्मपदासाठी अनेकवचनदर्शक क्रियापदाचे रूप वापरून ('तिचे पालक') वापरले पण क्रियापद मात्र 'शकत नाही' असे एकवचनी वापरले. पुढे 'प्रत्येक शाखेचे' यानंतर 'त्यांच्या विभागातील' या रूपातही हाच दोष आहे.

थोडक्यात, क्रियापदाचे लिंग/वचन कर्तृ/कर्मपद नामाच्या लिंग-वचनाप्रमाणे असते याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे.

आता ह्याच वाक्याची, आशय तोच ठेवून, दोन-तीन वाक्यांत फोड करून ते लिहिले तर सुबोध वाटते का नाही, पाहा बरे :

'एखाद्या मुलीच्या पालकांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असते. परिणामी ते तिच्या शिक्षणासाठी खर्च करू शकत नाहीत व म्हणून तिला शिक्षणापासून वंचित राहावे लागते. एसबीआयच्या प्रत्येक शाखेने आपल्या विभागातील अशा मुली दत्तक घेतल्या होत्या.'

इत्यर्थ, बातमीत मोठ्या, दीर्घ, मिश्र वाक्यांचे ओझे शक्यतो टाळावे, हे श्रेयस्कर.

**दीर्घ वाक्यांमुळे हेही होते**

'मुंबई सकाळ'च्या २९ एप्रिलच्या 'कवडसा' या सदरातील (पृष्ठ ७) "'घोषणां'चा महाराष्ट्र" या वृत्तातील हे वाक्य पाहा :

'मानवी इतिहासात जेव्हा जेव्हा राजकारण, समाजकारण, अर्थव्यवहार, संस्कृतीही एका प्रगत अवस्थेत पोहोचली. त्या त्या ठिकाणी त्या त्यावेळी माणसाची नजर केवळ स्वकीय, स्वदेश, स्वविद्या, स्वधर्म, स्वभाषा यांच्यातच न घोटाळता परकीय, परदेश, परधर्म, परभाषा यांच्यापर्यंत जाऊन फाकली.'

हेही वाक्य मोठेच आहे. पण ते बेडौल मात्र नाही. तथापी त्यात वेगळ्याच दोषाचा शिरकाव झाला आहे. लांब वाक्ये लिहिताना विरामचिन्हांकडेही लक्ष ठेवावे लागते.

उद्धृत वाक्यात पहिल्या वाक्यातील 'पोहोचली' या क्रियापदरूपानंतर वास्तविक अर्धविराम आवश्यक होता. त्याऐवजी तेथे पूर्णविराम पडला आहे. वाक्यातील आशय पूर्ण झालेला नाही. सांगणाऱ्याला आणखीही जे काही सांगायचे आहे तो विचार येथे पूर्ण होत नाही. म्हणून येथे पूर्णविरामाची जागा चुकीची. आणखी असे, की या वाक्यात 'जेव्हा जेव्हा' असे कालदर्शक अव्यय वापरले आहे. हे अव्यय जोडीने वापरले जाते. म्हणजे पूर्वार्धात 'जेव्हा'चा वापर केला, की उत्तरार्धात 'तेव्हा' या अव्ययाचा वापर क्रमप्राप्त असतो. हे अव्यय कालदर्शक आहे. मात्र या वाक्यात त्याच्या जोडीला 'त्या त्या ठिकाणी' व 'त्या त्या वेळी' अशी स्थल व कालदर्शक रूपे वापरली आहेत. येथे उत्तरार्धात एकतर फक्त 'त्या त्या वेळी' या कालदर्शक सूत्राचा वापर सयुक्तिक ठरला असता अथवा 'जेव्हा जेव्हा' बरोबरच 'जेथे जेथे' या स्थलदर्शक जोडीचा वापर पूर्वार्धात करणे योग्य ठरले असते.

दीर्घ वाक्यामुळे असे अवधान सुटू शकते.

आणखी एक बारीकशी चूक या वाक्यात आहे. 'संस्कृतीही' या शब्दाला 'ही' जोडल्यामुळे त्या 'ही'चे रूपांतर अव्ययात झाले. येथे अभिप्रेत अर्थ सर्वनामाचा असल्याने 'ही' हा 'शब्द' तोडून वापरला जायला हवा होता. (राजकारण, समाजकारण... या चारही शब्दांचा समुदायवाचक 'ही सर्व' असा अर्थ येथे अभिप्रेत आहे.)

**पक्की मांड हवी**

पल्लेदार किंवा दीर्घ वाक्यरचना हा भाषेचा विशेष गुण मानला जात असला, तरी भाषेवर पक्की मांड नसेल तर ह्याच गुणाचे सदोष वाक्यरचनेत पर्यवसान व्हायला वेळ लागत नाही. (पल्लेदार वाक्यरचना वर्तमानपत्रात, खरे तर एकवेळ अग्रलेखात खपून जाईल. पण बातमी मात्र सुटसुटीत, सहजगम्य वाक्यांची असावी. असे सांगतात, की 'सकाळ'चे संस्थापक-संपादक डॉ. ना.भि. परुळेकरांचा याबाबत कटाक्ष असे.) अवधान लेखकाच्या नकळत सुटते आणि वाक्याचा तोल ढळतो.

'मुंबई सकाळ'च्या २५ एप्रिल ०८च्या अंकातील एका बातमीतील हे वाक्य पाहा :

'कोणतीही फाईल सात दिवसांपेक्षा जास्त काळ टेबलावर राहू नये, असा कायदा असला, तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याबद्दल नापसंती व्यक्त करीत फाईलची गुणवत्ता कशी वाढवता येईल आणि दफ्तर-दिरंगाई टाळण्याकडे विशेष लक्ष द्यावे, असा आदेश मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आज मुख्य सचिवाना दिला.'

तीन-चार छोट्या वाक्यांत हा आशय अधिक सुगमपणे आणता आला असता. मोठे वाक्य करण्याच्या नादात क्रियापदांच्या रूपांकडे दुर्लक्ष झाले. वाक्यात मुख्यमंत्र्यांचे दोन आदेश अभिप्रेत आहेत. पण त्यांतील एकाचीच अभिव्यक्ती स्पष्टार्थबोधक झाली. (दप्तरदिरंगाई टाळण्याकडे विशेष लक्ष द्यावे) गुणवत्ता वाढवण्याबाबत 'आज्ञार्था'कडे दुर्लक्ष झाले. 'गुणवत्ता कशी वाढवता येईल' या पदानंतर फक्त 'याकडे' एवढा छोटा शब्द लिहिला असता तर पूर्वार्धातील आदेश व उत्तरार्धातील आदेश एकमेकांशी सुसंगतरित्या जोडले गेले असते आणि दीर्घ वाक्याची शैलीही राखता आली असती.

**अनवधान आणि अज्ञानही**

दि. २५ एप्रिल ०८च्या 'सकाळ टुडे' या पुरवणीतील 'वाचू आनंदे' सदरातील ही चुकीची शब्दयोजना पाहा : अनवधान आणि शब्दघडणीचे'/अर्थाचे अज्ञान, दोन्हींची निदर्शक. वृत्तलेखात पहिल्या परिच्छेदात 'मतितार्थ' असा शब्द आला आहे. हा शब्द

बहुतेक जण या प्रमाणेच लिहितात. वास्तविक तो 'मथितार्थ' आहे. मथित + अर्थ यांचा संधी होऊन हा शब्द बनला आहे. 'मथित' म्हणजे वादविवाद, चर्चा, वाटाघाट. त्याचा 'अर्थ म्हणून 'मथितार्थ' म्हणजे वादाचा निष्कर्ष, सारांश; त्याचे तात्पर्य, रहस्य. ('मथित' ह्याचा अर्थ कापडास ताण देण्याचे एक उपकरण असाही आहे आणि तो 'मतीत' असाही लिहिला जातो.)

पुढच्या परिच्छेदात वाचनाचा वेग वाढवण्यात आड येणाऱ्या चुकीच्या सवयींची नोंद आहे. 'बोट फिरवत वाचलं, पुटपुटणं इत्यादी. तो बदलण्याचा प्रयत्न करा.' या वाक्यातले प्रमाद हे अनवधान, लेखकाचे किंवा वृत्तलेख तपासणाऱ्याचे. संदर्भ लक्षात घेतला तर 'वाचलं'च्या ठिकाणी 'वाचणं' हवे. या 'सवयी' आहेत. मूळ शब्द स्त्रीलिंगी. त्यामुळे 'त्या' बदलण्याचा प्रयत्न करायचा; 'तो' बदलण्याचा नव्हे!

वृत्तलेखात पुढचाच मुद्दा 'चुकीचा शब्दबोध व अर्थबोध' हा आहे. त्यामुळे दर्शवलेल्या प्रमाणांना अधिकच गंभीर स्वरूप येते!

असाच प्रमाद असलेली आणखी एक बातमी. 'सकाळ'च्या २५ एप्रिल ०८ च्या अंकातील 'चौकशीचा फेरा' या शीर्षकाखाली सदरची बातमी आहे. (पृष्ठ ५) 'महसूल, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे अशा 'मोक्या'च्या खात्यांतील सुमारे दहा हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशा काळ रखडल्या असल्याचे समजते..' यात, 'काळ' याच्या आधी 'दीर्घ' किंवा तत्सम शब्द हवा. हे अनवधानच. कारण एरव्ही बातमीत 'खात्यांतील', 'दहा हजारांहून या शब्दांमध्ये अनेकवचनी रूपांतील अनुस्वारांबाबत, मुद्दाम उल्लेख करावा असा साक्षेप सांभाळलेला दिसून येतो.

शब्दाचा नेमक्या अर्थाने वापर करण्याबाबत अज्ञानाचे आणखी एक उदाहरण पाहा : 'सकाळ'च्या 'टुडे' पुरवणीतील. (२९-४-०८) 'शिक्षकांच्या प्रशिक्षण वेळेत बदल होणार' या मथळ्याखालील ह्या बातमीमधील वाक्ये अशी आहेत :

'...या कार्यक्रमावर पडलेले शिक्षक संघटनांच्या बहिष्काराचे सावट अखेर टळले आहे, अशी माहिती.... श्री. पाटील यांनी दिली.' 'सावट' टळत नसते. 'दूर होत' असते. आणखी एक बारीक चूक. 'पाटील यांनी' यातील 'यांनी' वरील अनुस्वार नको. ते अनेकवचनी रूप नव्हे. बहुमानार्थी-आदरार्थी एकवचनी रूप आहे. तेथे फक्त 'यानी' योग्य. नी हा तृतीयेचा प्रत्यय अनेक-वचनी आणि एकवचनी आदरार्थी असा दोन्ही अर्थांनी वापरला जातो.

**व्याकरणाच्या नियमांचे किमान ज्ञान**

कोणत्याही वाक्यात कर्ता, कर्म, क्रियापद ही तीन पदे अनिवार्यपणे असतात. क्वचित एखादे अध्याहृत. क्रियापद कर्ता, कर्म यांच्या लिंग-वचनाला अनुसरते. लेखन करणाऱ्याला एवढे किमान ज्ञान आवश्यक आहे. छापील लेखनाबाबत, त्याचे मुद्रितशोधन (प्रुफ रीडिंग) करणाऱ्यालाही ते आवश्यक आहे. त्याच्या अभावी बातम्या, वृत्तलेखन यांत अनेक प्रमाद डोकावतात.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या ३ मे ०८ च्या अंकातील हे उदाहरण पाहा :

'आता ग्राहक अनेक पर्यायांमधून त्याच्या आवडीच्या प्रकल्पाची अचूक निवड करू शकतात.' (टाइम्स प्रॉपर्टी, पृष्ठ १)

या वाक्यात 'त्याच्या' या कर्त्याचे (तो/ त्याच्या) एकवचन आहे. मात्र क्रियापद अनेकवचनात (शकतात) येते. येथे दोन प्रकारे दुरुस्ती सुचवता येईल. 'त्याच्या' हा (ग्राहक या) कर्त्याचा निदर्शक शब्द गाळून टाकायचा ('ग्राहक'चे एकवचनी व अनेकवचनी रूप सारखेच होते) किंवा क्रियापद 'तो' (ग्राहक) या कर्त्याच्या एकवचनी रूपास अनुसरून 'शकतो' असे करायचे.

असाच प्रकार 'लोकमत' (२५ एप्रिल २००८) च्या अंकातील एका वाक्यात झाला आहे. 'माणसे जोडण्यासाठी प्रेमाचा सेतू बांधा' या वृत्तात ('हॅलो मुंबई' - पृष्ठ ३) 'या पुस्तकाचा अनुवाद श्रीनिवास विठ्ठल भैरी यांनी केले आहे.' या वाक्यात क्रियापदाचा संबंध 'अनुवाद' या कर्माशी आहे. ते कर्मपद पुंलिंगात असल्याने क्रियापदाने त्याला अनुसरले पाहिजे. म्हणून हे क्रियापद 'केला आहे' असे हवे.

'सकाळ टुडे' (१ मे ०८, पृष्ठ १) मधील 'शहरात आणखी १०० स्कायवॉक (म्हणजे 'पूल'च ना? मग याला 'पूल रस्ता' का म्हणू नये?) या शीर्षकाखालील बातमीत 'या भेटीत एमएमआरडीए आणि पालिका मिळून ७६ रेल्वेस्थानकांवर १०० 'स्कायवॉक बांधील' असे वाक्य आहे. 'एमएमआरडीए व पालिका मिळून' अशी दोन (म्हणजे अनेकवचन) कर्तृपदे असल्याने क्रियापद 'बांधतील' असे हवे.

असेच आणखी एक वाक्य पाहा :

'..दहा वर्षापूर्वी विकासाच्या प्रक्रियेचे सुरुवात झाली. ती महापालिकेच्या मुख्य आयुक्तांनी घेतलेल्या पुढाकाराने (महाराष्ट्र टाइम्स, 'टाइम्स प्रॉपर्टी' - पृष्ठ ३) ('ठाण्याची जडणघडण')

या वाक्यात 'प्रक्रिया'पदाचा संबंध 'सुरुवात' या स्त्रीलिंगी शब्दाशी आहे. तेव्हा 'प्रक्रिया'ला लागणारा प्रत्यय स्त्रीलिंगी हवा. म्हणजे 'प्रतिक्रियेची सुरुवात' अशी ही दोन पदे हवीत. याशिवाय, चुकीच्या ठिकाणी पूर्णविराम दिल्याने एकाच संयुक्त वाक्याचे चुकीचे विभाजन झाले. '...सुरुवात झाली' व 'ती' या पदांमध्ये पूर्णविराम नको, स्वल्प-विराम हवा.

इत्यर्थ, व्याकरणाचे किमान ज्ञान बातमी-वृत्तांतलेखन करणाऱ्याला हवे.

**अनौचित्य**

मी तिसऱ्या लेखात (जुलै ०८) 'दरम्यान' व 'कोसो' या दोन शब्दांच्या अनुचित वापराची नोंद केली होती.

अलिकडे सर्रास वापरला जाणारा आणखी एक असाच शब्द म्हणजे 'सशक्त'. समीक्षा, नाट्य-चित्रपट परीक्षणे, चर्चा यांत किंवा तद्‌विषयक लेखनात हा शब्द वारंवार डोकावू लागला आहे. हिंदीचे हे अनावश्यक आक्रमण आहे का? मानवी गुणधर्मासाठी वापरायचा हा शब्द अमूर्त संकल्पनांसाठी कशाकरता वापरायचा? तेही, वाङ्‌मयीन संदर्भात त्या अर्थाचा 'कसदार' असा समर्पक, अर्थवाही, कलदार शब्द उपलब्ध असताना? 'सशक्त नाटक' चांगले की 'कसदार' नाटक? 'सशक्त आशय' समर्पक, अर्थवाही की 'कसदार आशय'?

**प्रतिसाद**

जुलै ०८ च्या अंकातील लेखात कारेकर या वाचकाच्या प्रतिसादाचा उल्लेख केला होता. त्यानी प्रस्तुत लेखकाचे या उपक्रमाबद्दल अभिनंदन करताना आपली निरीक्षणेही नोंदवली आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'मधील 'तू सुखी राहा' या मालिकेतील 'अरुला वाटलं, हा माणूस खरंच केवढी मदत करतो आहे आपली?' या प्रामादिक वाक्याचे (म.टा. - १ मे ०८) उदाहरण त्यांनी दिले आहे.

कारेकरांचे निरीक्षण अगदी बरोबर आहे. व्याकरणाच्या जंजाळात न शिरता येथे एवढेच स्पष्ट करतो, की 'मदत करणे' या क्रियापदाचा वाक्यात प्रयोग करताना, 'एखाद्याला मदत करणे' याप्रमाणे 'ला' विभक्तिप्रत्यय लावून केला जातो. 'एखाद्याची मदत करणे' असा 'ची' प्रत्ययान्त केला जात नाही. त्यामुळे उद्‌धृत वाक्यात 'आपली' हे रूप सदोष आहे. ते 'आपल्याला' असे हवे.

नाटक, दूरदर्शन मालिका यांतील संवादही असे प्रामादिक असतात, असे कारेकरांचे आणखी प्रतिपादन आहे. पण त्याची चर्चा वेगळ्या कक्षेत करावी लागेल.

कारेकरांनी 'स्वार्थ' शब्दाचा वापर सदोष होतो असेही नजरेस आणले आहे. 'स्वतःचा सार्थ, माझा स्वार्थ, अशी रूपे अनेकदा सामोरी येतात. ती प्रामादिकच आहेत. 'स्वार्थ' म्हणजे फक्त स्वतःचा अर्थ, हितसंबंध साधला, जपला आहे, असे. 'स्व' हा शब्द त्याचा निदर्शक आहे. त्यामुळे स्वतःचा, माझा असे (विशेषण) पद त्यामागे लावणे ही पुनरावृत्तीच. अर्थातच अनावश्यक. मात्र या शब्दाच्या अर्थ-चर्चेची व्याप्ती वाढू शकते. तथापी त्याबाबत पुढच्या लेखात.

**जयवंत वसंत चुनेकर**
**अहमद सेलर बिल्डिंग, बि. क्र. ८, खोली क्र. २७, स. मो. जाधव मार्ग, नायगाव, दादर, मुंबई ४०००१४**
**दूरध्वनी २४१३५२७४ / ९९६९०३१९३५**




**न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**

**४०० रु. सवलतीत २४० रु.**

स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर, न्यायालयीन व्यवहार प्रांतिक भाषेत (लोकभाषेत) झाल्यास सर्वसामान्यांना सुलभ झाले असते. परंतु, आज स्वातंत्र्यप्राप्तीच्या साठ वर्षांनंतरही महाराष्ट्रात मराठीच्या वापराबाबत हवी तशी प्रगती नाही. या विषयावर वेळोवेळी चर्चा-प्रिसंवाद झाले. विविधांगी लिखाण झाले, शासनाने ठराव मांडले व यातील अडचणींचे निराकरण करण्याचा ऊहापोह झाला.

महाराष्ट्रात 'न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा' यांचा समन्वय साधण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचा हा सर्वांगीण आढावा.

आयुष्य साफल्याने जगलेल्या मान्यवर व्यक्तीची मुलाखत दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सायंकाळी ६ ।। वा. इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या म.फुले कन्याशाळा सभागृहात होत असते. हा जूनमधील मुलाखतीचा वृत्तांत. २३ ऑगस्टला दीपा श्रीराम / आशा साठे

# युती सरकारने संकेत मोडले!

## द. म. सुकथनकर / मृणालिनी नानिवडेकर

**मृणालिनी नानिवडेकर** – मराठी माणसाने महाराष्ट्रात राहताना अनेक गंड जोपासले. आमच्या राज्याचा सचीव कोणीतरी दक्षिणी व्यक्ती असणे, मुंबई खरोखर आमची आहे का अशा प्रकारचे प्रश्न.

पण या गंडांना छेद देणाऱ्या ज्या काही घटना घडल्या, त्यांपैकी एक मुख्य सचिवांची परंपरा. त्या परंपरेतले कर्तबगार पुरुष, शिर्डीच्या संस्थानावर आलेल्या बालंटाना पुरून उरणारे अधिकारी व अशा अनेक प्रकारांनी द. म. सुकथनकर हे नाव सर्वांना परिचित आहे.

स्वातंत्र्याच्या पहाटे, मराठी तरुण ज्या क्षेत्राचा फारसा विचार करायचे नाहीत अशा प्रशासकीय सेवेत तुम्हाला का यावेसे वाटले?

**द.म. सुकथनकर** – तेव्हा इतर व्यवसायातील साधने कमी होती. सिव्हिल सर्विस हा एक चांगला प्रोफेशन होता. देशसेवा करायला मिळावी म्हणून मी या क्षेत्रात आलो वगैरे कृत्रिम दावा मी करणार नाही. मी जेव्हा सिव्हिल सर्विसच्या परीक्षेला बसलो तेव्हा सुरतला कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो. त्यावेळी ह्या परीक्षेला बसणारे जवळजवळ साठ टक्के लोक हे ॲकॅडमिक लाईनमध्ये असायचे. मी लेक्चरर असताना मला अडीचशे रुपये पगार होता. त्यामुळे सिव्हिल सर्विसमध्ये मिळणारा पगार, आदर, मान यांचे आकर्षण वाटले, म्हणून मी या परीक्षेला बसायचे ठरवले.

**नानिवडेकर** – त्यावेळी आपली कौटुंबिक परिस्थिती कशी होती? आपल्या कुटुंबातील कोणी या क्षेत्रात होते का?

**सुकथनकर** – माझ्या भावंडांमध्ये मी सर्वात मोठा होतो. माझ्या आईच्या बाजूचे म्हणजे नाडकर्णी परिवारातील काहीजण बरोडा स्टेट सिव्हिल सर्विसमध्ये होते. त्यांचा कदाचित माझ्यावर प्रभाव पडला असेल.

**नानिवडेकर** – स्वातंत्र्याला एक दशक झाले होते. अशा वेळी भारताच्या नवनिर्माणाचे स्वप्न प्रशासकीय सेवेतही दिसायचे का?

**सुकथनकर** – मी जेव्हा इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विसमध्ये प्रवेश केला तेव्हा नियोजनबद्ध विकासाला सुरुवात झाली होती. तेव्हा जवाहरलाल नेहरू, कम्युनिटी डेव्हलमेंट नॅशनल एक्स्टेंशन सर्विसमध्ये असलेले अशी माणसे होती. लोकांच्या सहभागाने विकास साधणे, लोकांना त्यात सामावून घेणे, म्हणजे विकासकामाचा खर्च शंभर रुपये असेल तर त्यांपैकी साठ रुपये सरकारने दिले तर चाळीस रुपये सोसायटीने द्यावे अशी प्रथा सुरू झाली होती. ह्या नवीन वातावरणाचा आमच्या मनावर परिणाम झाला होता. आपणही ह्या विकासकार्यात उत्तम व ठोस कामगिरी बजावली पाहिजे असे मनापासून वाटत असे.

**नानिवडेकर** – आपण प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी, सेक्रेटरी अशा विविध पदांवरून काम केले. त्याबद्दल सांगा ना!

**सुकथनकर** – सुरुवातीला दोन–अडीच वर्षे मी प्रात ऑफिसर होतो. त्यानंतर मी मंत्रालयात ॲग्रिकल्चर अँड फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये अंडरसेक्रेटरी म्हणून आलो. १९६० साली पानशेत धरण फुटले तेव्हा पुण्याच्या कलेक्टरवर पुनर्वसनाच्या कामाचा ताण इतका वाढला, की एक ॲडिशनल कलेक्टर तेथे असूनही आणखी एका ॲडिशनल कलेक्टरची पोस्ट निर्माण करण्यात आली. त्या जागेवर माझी नेमणूक झाली. एक वर्षभरात विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेमुळे जिल्हापरिषदेचा एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून माझी नियुक्ती झाली. त्यानंतर सहा–सात महिने मी तेथे राहिलो. तेवढ्यात जवाहरलाल नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना दिल्लीला बोलावल्यामुळे ते संरक्षणमंत्री म्हणून तिकडे गेले व कन्नमवार इथे मुख्यमंत्री म्हणून आले. त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून माझी नेमणूक झाली. बरीच वर्षे, मी मुंबईच्या मंत्रालयात काम केले. त्या सतरा–अठरा वर्षांच्या काळात महत्त्वाचा टप्पा सांगायचा झाला तर, चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर ऑफ पुणे जिल्हापरिषद म्हणून सहा–सात महिने आणि एज्युकेशन डिपार्टमेंटमध्ये शिक्षणसचीव या पदावरून केलेले काम या दोन गोष्टींचा उल्लेख करीन. मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री होते. धडाडीचे व नेक मंत्री म्हणून त्यांनी नाव कमावले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पगडा सर्वच खात्यामध्ये होता.

**नानिवडेकर** – शिक्षणक्षेत्रात अनेक महत्त्वाचे निर्णय आणि राज्याचा पाया घालणाऱ्या बऱ्याच योजना कार्यान्वित झाल्या. आपलाही त्यात मोठा वाटा असेल. त्याबद्दल सांगावं.

**सुकथनकर** – शिक्षण विभागात मी उपसचिव म्हणून आठ वर्षे आणि मुख्य सचिव म्हणून तीन–साडेतीन वर्षे, अशी एकूण सुमारे बारा वर्षे काम केले. उपसचिव म्हणून काम करत

असताना व्हाईटपेपर ऑन एज्युकेशन आला. त्यावर फारच वाद घडून आले. ऑर्डिनरी लेव्हल कोर्सेस आणि ॲडव्हान्स लेव्हल कोर्सेस ही संकल्पना प्रथमच मांडण्यात आली. तुम्ही समाजाचे विभागीकरण करता आहात वगैरे अनेक आरोप त्यावेळी पुढे आले. जे. पी. नाईक, चित्रा नाईक अशा शिक्षण-तज्ज्ञांशी चर्चा करून तो एज्युकेशन डॉक्युमेंट तयार केला होता, पण त्याचा विपर्यास व्हायचा तो झाला. त्यावर जे मतप्रवाह आले ते म्हणजे एक पोलिटिकल रिॲक्शन होती. एज्युकेशनल डॉक्युमेंट म्हणून त्याच्याकडे दुर्दैवाने कोणीच पाहिले नाही. अखेर, त्याला मूठमाती द्यावी लागली. तो जो एक लर्निंग प्रोसेस होता म्हणजे एकीकडे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होत होते, त्याचबरोबर त्याची गुणवत्ता टिकवण्यासाठी स्पेशली गिफ्टेड स्टुडण्ट आहेत, जे पुढे समाजाचे नेतृत्व करू शकतील त्यांच्याकडे खास लक्ष द्यायला पाहिजे; त्यांच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. हे मांडण्याचा प्रयत्न त्या डॉक्युमेंटतर्फे झाला, म्हणून मी त्या डॉक्युमेंटला महत्त्व देतो.

दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे मी शिक्षणसचिव असताना १०+२+३ हा नवीन पॅटर्न आला. शाळेचा एक वर्ग कमी झाला. काही शाळांना अकरावी-बारावीचे वर्ग जोडले गेले. म्हणजे एक वर्ग वाढल्यामुळे तेथे अधिक स्टाफची गरज होती. म्हणजे एकीकडे सरपल्स आणि दुसरीकडे रिक्वायरमेंट होती. कॉलेजमध्येही अकरावी-बारावीचे वर्ग जोडले गेले. त्याचबरोबर व्होकेशनलायझेशन करणे गरजेचे होते. एकंदर स्थित्यंतरात फार गुंतागुंत होती. हा जो एक कालावधी होता तो फार चॅलेंजिंग होता.

**प्रश्न –** शिक्षण व व्होकेशनल कोर्सेस हा तिढा कसा सोडवला?

**सुकथनकर –** हा तिढा व्होकेशनलाय-झेशनमुळे सुटला असे मी म्हणणार नाही. त्या कोर्सेससाठी लागणारे ज्ञान व स्किल त्या शिक्षकाकडे नव्हते. त्यामुळे व्होकेशन-लायझेशनची जेवढी प्रगती व्हायला हवी तेवढी झाली नाही. विद्यार्थी कॉमर्स, आर्ट्स, सायन्स याच विषयांकडे जात राहिले. आय.टी.आय. किंवा पॉलिटेक्निक यांमध्ये थोडेबहुत व्होकेशनलायझेशन झाले. त्या व्यवसायांमध्ये मुलांना आपली चरितार्थाची साधने मिळतील, नोकऱ्या मिळतील अशी खात्री नव्हती. आता आपण सर्विसेस सेक्टरमध्ये जे व्होकेशनलायझेशन पाहतो मग ते एंटरटेनमेंट असो वा प्रिंटिंगमध्ये असो तशा प्रकारचे डायव्हर्सिफिकेशन त्याकाळी होऊ शकले नाही. आता, आपल्या लक्षात आले आहे की व्होकेशनलायझेशनची आवश्यकता किती आहे; त्याचबरोबर वेगवेगळ्या कौशल्यांची आवश्यकता वाटू लागली आहे. अनेक प्रकारच्या व्यवसायक्रमांना मुले प्रवेश घेतात, कारण त्यांना तेथे नोकरीची हमी असते.

**प्रश्न –** खूप महत्त्वाच्या मुद्याला हात घातलाय. जेव्हा काळाच्या पुढची पावले असलेले निर्णय घेतले जातात तेव्हा ते जनतेला समजावून सांगायला राजकीय नेते कमी पडतात का? की ती व्यवस्थेमुळे येणारी त्रुटी असते?

**सुकथनकर –** आपणच कमी पडतो असे मी म्हणेन. शिक्षणाचा पॅटर्न बदलण्याच्या, व्यवसायीकरण सुरू करण्याच्या बरोबरच विकासदराचा पुरेसा विचार त्यावेळी झाला नाही. त्याचे काय परिणाम होतील याचे योग्य आकलन आम्हा प्रशासकांना आणि विचारवंतांना झाले नसावे. केवळ इतर राष्ट्रांमध्ये होत आहे म्हणून आपल्याकडे तसे झाले पाहिजे या दृष्टीने त्या शिफारशी केल्या गेल्या असतील. त्याचबरोबर मागणी निर्माण होण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यांची पूर्तता येथे होणार आहे की नाही याचा तेवढा विचार झाला नाही.

**प्रश्न –** तुम्ही मुंबई महानगरपालिकेचे आयुक्तपद भूषवले. ती वर्षेसुद्धा मुंबईच्या इतिहासातील फार महत्त्वाची वर्षे होती. त्या काळाबद्दल?

**सुकथनकर –** मी आधी उद्योग सचिव होतो. तेव्हा अंतुले मुख्यमंत्री होते. त्यांचा खाक्या असा होता, की ज्या अधिकाऱ्याशी त्यांचे जमणार नाही त्याला तेथून उचलून बाजूला करायचे. मी त्यांच्याबरोबर डेप्युटी सेक्रेटरी म्हणून काम केले होते. आय वाज इनकन्व्हिनीयंट टू हीम ॲट दॅट टाईम. म्हणून मला एमएमआरडीएमध्ये पाठवले. त्या काळात माझ्या असे लक्षात आले, की मुंबई शहराचा केवळ शहर म्हणून विचार करता कामा नये तर त्याच्या आजुबाजूचा प्रदेश आहे त्याच्या संदर्भात शहराचा विचार झाला पाहिजे. त्याला पूरक असे बदल जर तेथे झाले नाहीत तर मुंबई शहराचा अपेक्षित विकास होणार नाही. म्हणून इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ एंटायर मेट्रोपोलिटन रिजन यासाठी एमएमआरएडीची स्थापना झाली. त्यानंतर ज्या अंतुलेनी मला इंडस्ट्रीज डिपार्टमेंटमधून काळ्या पाण्यावर म्हणून एमएमआरडीएमध्ये पाठवले. त्यांनीच पुन्हा माझी नियुक्ती मुंबई महापालिका आयुक्त म्हणून केली.

त्या काळातील दोन गोष्टी मला सांगाव्याशा वाटतात. त्या म्हणजे - म्युनिसिपल कर्मचाऱ्यांचे दोन मोठे संप त्या काळात झाले. कर्मचाऱ्यांच्या पुढाऱ्यांशी बोलणी केली तरी शेवटी ज्या वाटाघाटी करायच्या त्याला जॉर्ज फर्नांडिसनी हिरवा कंदिल दाखवल्याशिवाय बोलणी यशस्वी झाली असे म्हणता येत नसे. त्या संबंधीचे अनुभव मी विसरू शकत नाही.

**प्रश्न –** जॉर्ज हे बंदसम्राट. त्यांच्याशी बोलणी कशी व्हायची?

**सुकथनकर –** जॉर्जनी एस. के. पाटील-सारख्या नेत्याला धूळ चारली किंवा त्यांची

बोलण्याची पद्धत भडक आहे, वगैरे अशी जॉर्ज फर्नांडिस यांची प्रतिमा होती, पण मला तसे काहीच वाटले नाही. टेबलावर आमनेसामने बोलणी करताना थ्रेटनिंग वगैरे काही वाटले नाही.

**प्रश्न –** जॉर्जची प्रशासनाला अडचणीत आणायची भूमिका असायची का?

**सुकथनकर –** त्यांची संप करण्याची एक पद्धत असायची. संपावर जातानाच, तो किती लांबवायचा हे त्यांनी ठरवलेले असे. ते काय कॅलक्युलेशन करत ते माहीत नाही. संप करून, लोकांना जास्तीत जास्त नाडून, पब्लिक सपोर्ट मिळवून जेवढे अधिकाधिक मिळवता येईल तेवढे मिळवायचे, पण ते सगळे तेवढ्याच काळात. तो तेवढा कालखंड संपला की संप मागे घ्यायचा; की पुन्हा दोन वर्षांनी मागण्या मांडून पुन्हा तेच करण्यासाठी ते तयार असत!

वाटाघाटी करताना, 'आम्ही पुन्हा कधीही असा संप करणार नाही' अशा अर्थाचे लिहून देताना आपणा काही मॉरल कमिटमेंट करत आहोत असे त्यांना कधीही वाटले नाही! कोर्टात जायची वेळ आलीच तर हा संप बेकायदेशीर आहे हे सांगण्यासाठी आधार म्हणून आम्ही ते त्यांच्याकडून लिहून घ्यायचो, एवढेच! म्युनसिपल कामगार पावसाळ्यात संपावर जाणार किंवा शिक्षकवर्ग परीक्षेच्या काळात संप करणार हे ठरलेले असायचे. सुदैवाने केरळ कोर्टाच्या निर्णयामुळे आपण आता त्यापासून वाचलो आहोत. पण संपकरी दुसरे काहीतरी शस्त्र काढणारच नाहीत असे नाही, म्हणून आपण नेहमी सतर्क राहिले पाहिजे. योग्य मागण्या असतील तर जास्त ताणून धरायचे नाही. एका विशिष्ट मर्यादेपलीकडे मागण्या मान्य करणे शक्य नसते. यू हॅव टू ड्रॉ ए लाईन समव्हेअर. जेणेकरून लवकरात लवकर तिढा सुटू शकेल अशा आधारावर बोलणी केली पाहिजेत.

**प्रश्न –** आयुक्तपदाच्या आणखी काही गोष्टींबद्दल आपण बोलत होतात...

**सुकथनकर –** दूरगामी परिणाम करणाऱ्या दोन केस मला आठवतात. अंतुलेनी मला आणि होमसेक्रेटरी साळवी यांना रस्त्यांवरील फूटपाथवरील झोपड्यांविरुद्ध ॲक्शन घ्यायला सांगितले. त्यावेळी पीपल हॅव ए फंडामेंटल राईट टू स्टे ॲण्ड लीव एनीव्हेअर ऑन व स्ट्रीट ऑर पेवमेंट असा एक विचार मांडला गेला. त्याला राईट टू प्रोफेशन–व्होकेशन ॲड राईट टू लीव असे एक गोंडस स्वरूप त्यांच्यातर्फे देण्यात आले; ग्रुपलिडर होते त्यांच्याकडून फेरीवाल्यांसाठी काही पॉलिसी निर्माण केल्या गेल्या. त्यांचा उल्लेख यासंबंधीच्या कोर्ट जजमेंटमध्ये आला आहे. न्या. चंद्रचुड गेव्ह धीस टू जजमेंट्स. यातून नेमका सर्वसाधारण नागरिकांचा हक्क कोणता आणि दुसऱ्या बाजूने तो हक्क हिरावून घेऊन 'आमचा जगण्याचा आणि हवा तो व्यवसायधंदा करण्याचा हक्क' हे दोन हक्क कसे सामावून घेता येतील आणि त्याबाबत सीमारेषा कोणती याबाबत महत्त्वाचा निकाल चंद्रचुडांनी दिला आणि तो अजूनही अनुसरला जातो.

**प्रश्न –** महापालिकेवर लोकनियुक्त प्रतिनिधींना बाजूला ठेवून प्रशासक नेमण्याची वेळ का आली?

**सुकथनकर –** 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असे म्हणता येईल. इलेक्शन घेतले तर बहुसंख्या मिळणार नाही असे कॉँग्रेसचे काहीतरी गणित होते. म्हणून या निवडणुका पुढे ढकलू या, आपल्या साधनसामग्रीचा पुन्हा एकदा लेखाजोखा घेऊ आणि नंतर योग्यवेळी निवडणुका घडवून आणू असे काहीतरी ठरवले गेले. लोकनियुक्त मंडळाची सर्व सत्ता व अधिकार प्रशासक ही संज्ञा असलेल्या अधिकाऱ्याला देण्यात आली. एकाच वेळेला आयुक्त म्हणून आणि दुसऱ्या बाजूला लोकनियुक्त मंडळाचा प्रशासक या दोन पदांचा भार एकाच व्यक्तीवर आला. ही पद्धत जेमतेम एक वर्ष टिकली. हे वर्ष म्हणजे मुंबई महानगरपालिकेचा 'काळा कालखंड' होता असेच मी म्हणेन, कारण सबळ कारण नसताना ती निवडणूक पुढे ढकलण्यात आली. त्याचे परिणाम त्या पक्षाला भोगावेही लागले.

**प्रश्न –** मला वाटते, वसंतदादा त्यावेळी मुख्यमंत्री होते.

**सुकथनकर –** हो, पण तो दोष त्यांचा नाही. मुरली देवरा हे त्यावेळी प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांची कदाचित ही गणिते असतील आणि वसंतदादांनी ती मान्य केली असावीत.

**प्रश्न –** अशा संधिकाळात मंत्रालय त्या प्रशासकावर दबाव आणून आपले अधिकार मागील दाराने प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करते का?

**सुकथनकर –** अंतुले यांनी माझे तिथे पोस्टिंग केल्यावर माझ्याकडून अंतुलेंना काहीतरी काम करवून घ्यायचे असावे असे माझ्या कानावर यायचे, पण अंतुले यांनी दूरान्वयानेसुद्धा एकही गोष्ट कधी करायला सांगितली नाही. कारण तेव्हा तसे वातावरणच नव्हते. एकदा आपण अधिकाऱ्याला तेथे नेमल्यावर तो त्याच्या परिस्थितीचा साकल्याने विचार करून, कायद्यानुसार आपल्या जबाबदारीवर जो काही निर्णय घेईल तो योग्य असेल अशी धारणा त्या राज्यकर्त्यांनाही असायची. अर्थात त्या अधिकाऱ्याला नेमण्यापूर्वी जो खून पाहात असत, पण अधिकारी म्हणजे साधन नव्हे आपल्याला जे काही साध्य करायचे आहे त्यासाठी अधिकाऱ्याचा माध्यम म्हणून उपयोग करायचा ही प्रथा त्यावेळी नव्हती. त्यावेळचा माहोल अगदी वेगळा होता. ही जी जुनी परंपरा होती तिला तिलांजली देण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून प्रशासकीय व्यवस्थेमध्ये अधोगती झाली आहे.

कोणत्याही प्रशासकाला वेगळे मत मांडण्याची मुभा नाही. त्याने वेगळे मत मांडले तर ते सहन केले जात नाही, ऐकून घेतले जात नाही. उलट, आपल्या किंवा पक्षाच्या स्वार्थासाठी अधिकाऱ्याने योग्यायोग्य सर्व काही करावे अशी राज्यकर्त्यांची इच्छा असते.

**प्रश्न –** प्रशासकांनी लोकनियुक्तांपुढे झुकायला सांगितले तर रांगत जायचे हे कोणत्या कालखंडात सुरू झाले?
**सुकथनकर –** मी नाव घेत नाही कोणाचे, पण एका विशिष्ट मुख्यमंत्र्यांनी एका विशिष्ट अधिकाऱ्याला डावलून दुसऱ्या अधिकाऱ्याला त्या विशिष्ट पदावर नेमले आणि त्यानंतर राजकीय स्थित्यंतर झाले. मग जो अधिकारी डावलला गेला होता त्याने योग्य ठिकाणी जाऊन आपली योग्य तशी नियुक्ती करून घेतली. त्यानंतर अशा काही गोष्टी घडत गेल्या की त्यामुळे आपल्याला पद मिळवण्यासाठी मर्जी संपादन करण्यासाठी अधिकाऱ्यांनी जी काही तडजोड केली त्यातून हे निर्माण झाले. त्याआधीच्या काळात सतत एकाच पक्षाचे म्हणजे काँग्रेसचे राज्य होते. राजकीय स्थित्यंतरानंतर आलेल्या युतीचे लोक प्रथमच मंत्री झाले होते. हे आपले वैयक्तिक सचिव नाहीत तर ते एका शासकीय खात्याचे सचिव आहेत. हा फरक युतीसरकारच्या मंत्र्यांच्या लक्षातच आला नाही. पूर्वीची जी परंपरा होती, प्रशासक व राज्यकर्ते यांच्यामध्ये जे परस्पर नाते होते ते बिघडले. अंतुलेंच्या काळातसुद्धा त्यावेळच्या देशमुखांसारख्या कार्यक्षम अधिकाऱ्यांनी हा समतोल ढळू दिला नव्हता, पण त्यानंतर अधिकारी तसे राहिले नाहीत. युतीच्या मंत्र्यांना प्रशासकीय यंत्रणा, कारभार कसा चालवायचा याचे आकलन नव्हते. त्यामुळे त्या चार-पाच वर्षांत सगळी धुळधाण झाली आणि ते राज्यकर्त्यांच्या फायद्याचे असल्यामुळे त्यानंतरच्या राज्यकर्त्यांनीही ते तसेच चालू ठेवले.

**प्रश्न –** एका विशिष्ट पदावर जायचे म्हणून मंत्र्यांना घरी जाऊन दंडवत घालणाऱ्या अधिकाऱ्यांना पाहून तुम्हाला व्यक्तिगत काय वाटते?
**सुकथनकर –** काय वाटायचे? जे तुम्हाला वाटते तेच मलाही वाटते. असे कधी कोणी करेल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. हा नवीनच शिरस्ता पडला. १९९० पूर्वी असे काही नव्हते. ज्येष्ठत्वानुसार अधिकारपदे मिळत. अर्थात तेसुद्धा शंभर टक्के योग्य होते असे मी म्हणणार नाही. सिनिऑरिटी अनलेस इटीज रिक्वायर्ड टू बी गीव्हन अ गो बाय फॉर स्पेसिफिक रिझन वुईच एनीबडी कॅन ॲप्रीशिएट. सिनिऑरिटी इन दी सिव्हिल सर्विस हॅज टू प्रीव्हेल ॲज ये नेसेसरी इव्हील परहॅप्स. टू गीव्ह इट ए टोटल गो बाय कॅन क्रिएट फार मोअर प्रॉब्लेम्स दॅन ॲडेड इन टू ॲक्सेप्ट बायपासिंग इट व्हेन इटीज ॲब्सोल्युटली नेसेसरी नॉट बिकॉज ऑफ आय डोण्ट लाईक द फेस ऑफ ए ऑर बी बट बिकॉज ए व्हॅलिड रिझन.

सिव्हिल सर्विसचे जे काही संकेत आहेत ते तोडायला एकदा सुरुवात केली की ती परिस्थिती पुन्हा पूर्ववत आणणे फार कठीण आहे.

**प्रश्न –** सिनिऑरिटी सुपरसीड करायची तर काही व्हॅलिड रिझन्स हवीत असं तुम्ही म्हणालात पण अशी व्हॅलिड रिझन्स नेमकी कोणती, हे ठरवणारी यंत्रणा असू शकेल का?
**सुकथनकर –** कान सोनारानेच टोचावे लागतात. पुलिस रिफॉर्म कमिशनने पुलिस सर्विसच्या संदर्भात काही रेकमेंडेशन्स केल्या होत्या. डायरेक्टर जनरल ऑफ पोलिस किंवा कमिशनर ऑफ पोलिस ही जी महत्त्वाची पदे आहेत. त्यांच्या निवडीसाठी अशी प्रोसिजर असावी की त्यासाठी केवळ एक चीफ मिनिस्टर किंवा होम मिनिस्टर यांनी निर्णय न घेता चार-पाच लोकांचे एस्टॅब्लिशिंग बोर्ड किंवा त्यांच्यात एक लीडर ऑफ दि ऑपोझिशन घेऊन अशा प्रकारच्या कॉंपोझिट यंत्रणेतर्फे ते सिलेक्शन व्हावे, जेणेकरून केवळ अमूक एका पक्षाला पाहिजे म्हणून ते घडले असा दुर्गंध येता कामा नये. यासाठी आवश्यक ते सेफगार्ड आपल्याला इंट्रोड्युस करावे लागतील. हे फक्त पोलिस सर्विसमध्ये नाही तर एज्युकेशन सर्विस असो की हेल्थ सर्विस, त्यामध्ये पोस्टिंग किंवा ट्रान्सफर ह्या गोष्टी आपल्या मर्जीनुसार करता येतात असा समज रूढ झाला आहे. तो आपल्याला कटाक्षाने काढून टाकला पाहिजे. त्यासाठी अल्टर्नेटिव्ह स्ट्रक्चर काय असावे हे पोलिस यंत्रणेच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेलेच आहेत. आपल्या राज्याने तसेच करायचे ठरवले आहे असे आर.आर. पाटील म्हणतात. ती प्रक्रिया चालू आहे. सुनर ऑर लेटर थिंग्ज वील हॅव टू बी एक्स्टेंडेड टु अदर सर्विसेस.

**प्रश्न –** एखाद्याची बदली झाली की नागरिक मोर्चा काढतात. हा प्रकार पाहून आपल्याला कान टोचावेसे वाटतात का?
**सुकथनकर –** अशा तऱ्हेने पब्लिकला इनसाइट करणे, ट्राइंग टू गेट टोटल पब्लिक सपोर्ट हे एक दुधारी शस्त्र आहे. ते कधी तुमच्यावरही उलटेल त्याऐवजी जर आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असेल तर तुम्ही न्यायालयाकडे दाद मागू शकता.

**प्रश्न –** ज्याप्रमाणे पोलिसक्षेत्रात नियम लागू होतील अशी आपण अपेक्षा करत आहोत त्याप्रमाणे नागरी क्षेत्रातही होऊ शकतील का?
**सुकथनकर –** हो. दोन दिवसांपूर्वी बातमी आली आहे, की मुख्यमंत्र्यांनी काही अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या, एका ठिकाणी पोस्टिंग केले आणि लगेच सात दिवसांत त्या अधिकाऱ्याला दुसरीकडे हलवले. सगळे अधिनियम पायदळी तुडवून या गोष्टी घडल्या. याकरता प्रत्येक संबंधित

अधिकाऱ्याला कोर्टात जाणे काही सोपे नाही. ते शक्यही नाही. ही जी प्रथा पडत आहे की कोणत्याही अधिकाऱ्याला इथून तिथे, तिथून इथे हलवले जाते; यातून जी प्रवृत्ती दिसते ती आक्षेपार्ह आहे. ती टाळण्यासाठी म्हणून लोकांचा मानसिक दबाव शासनकर्त्यांवर असला पाहिजे. जो पोलिस सेवेमध्ये वाढल्यामुळे तिथे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला आहे. असे घडू नये म्हणून समाजातील सूज्ञ व्यक्तींनी शासनावर दबाव आणण्यासाठी काहीतरी केले पाहिजे.

**प्रश्न –** आपण मुख्य सचिव म्हणून आलात त्याआधी दिल्लीत होतात. तो घटनाक्रम सांगाना!

**सुकथनकर –** मी त्यावेळी दिल्लीला शहरविकास मंत्रालयात खास सचिव म्हणून आणि नंतर सचिव म्हणून होतो. तेव्हा इथे केशवराव परांजपे मुख्य सचिव होते. त्यांचा कालावधी ऑगस्ट १९८८ मध्ये संपणार होता. त्यावेळी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यानंतरचा ज्येष्ठ मीच होतो. म्हणून ते दिल्लीला आलेले असताना त्यांनी मला विचारले, 'आर यू विलिंग टू कम बॅक टू द स्टेट ॲज चीफ सेक्रेटरी?' मी तत्काळ मान्य केले, कारण दिल्लीला, मी अनेक कारणांनी सुखात नव्हतो. पण प्रत्यक्ष जेव्हा परांजप्यांचा कालावधी संपला तेव्हापर्यंत शंकरराव चव्हाण दिल्लीला गेले होते आणि शरद पवार मुख्यमंत्री झाले. अर्थात शरद पवारांबरोबर मी पूर्वी काम केले होते. त्यावेळी 'हा अधिकारी चव्हाणांचा' किंवा 'हा अधिकारी पवारांचा' असे काही समीकरण नव्हते. असले तरी त्यात राजकीय धागादोरा नव्हता. उदाहरणार्थ, आर.डी. प्रधान हे काही पोलिटिकल माईंडेड नव्हते पण वाय.बी. चव्हाणांबरोबर प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून अनेक वर्षे काम केल्यामुळे ही वॉज थॉट टू बी अलाईंड वुईथ पर्टिक्युलर ग्रुप. नंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला ते सोडून द्या. ते गौण आहे. थोडक्यात हे स्थित्यंतर झाले तरी त्याचा परिणाम माझ्या इथे परत येण्यावर झाला नाही.

**नानिवडेकर –** या सगळ्या मोठ्या कालावधीत आपला अनेक मोठ्या लोकांशी संबंध आला. शंकरराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण, शरद पवार, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील... त्यांच्याबद्दल काहीतरी सांगाल?

**सुकथनकर –** मजवर पहिल्यांदा मुख्यमंत्री म्हणून प्रभाव पडलो तो यशवंतराव चव्हाणांचा. ते लोकशाहीवादी होते. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे यावर त्यांचा नितांत विश्वास होता. जिल्हापरिषद स्थापन झाल्यानंतर यशवंतरावांनी धनंजय गाडगीळ, जे गोखले इंन्स्टिटयूटचे डायरेक्टर होते त्यांच्या मदतीने पुण्याला जिल्हापरिषदांचे अध्यक्ष, विविध विषय समित्यांचे अध्यक्ष आणि आम्ही नवनियुक्त एक्झिक्युटिव्ह अशा सगळ्यांना एकत्र बोलावून चर्चा केली. हे स्थित्यंतर काय आहे, त्यामागील उद्दिष्ट काय आहे, ते यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे, नवनिर्वाचित राजकारण्यांनी कोणती पथ्ये पाळावीत, अधिकाऱ्यांनी कोणती पथ्ये पाळावीत असे विविध विषय चर्चिले गेले. त्या प्रशिक्षणकाळात यशवंतरावांनी म्हटले होते, की अधिकाऱ्यांनी होय म्हणायला शिकावे आणि राजकीय पुढाऱ्यांनी नाही म्हणायला शिकावे. नवनिर्वाचित पुढाऱ्यांनी उगीच 'हो हो आम्ही करून देतो' असे न म्हणता, त्यांची प्रशासकीय मर्यादा काय आहे, आर्थिक मर्यादा काय आहे हे पाहावे. लोक तात्पुरते नाखुश झाले तरी 'हे करणे योग्य नाही' हे त्यांना पटवून द्यावे किंवा 'आपण पुन्हा विचार करू' असे समजावून सांगावे.

अधिकाऱ्यांना 'होणार नाही' हे सांगणे सोपे वाटते, पण लोकांची डिमांड असली आणि खरोखरच त्यात तथ्य असेल तर पॉलिसी बदलून किंवा आवश्यक वाटल्यास नियम बदलून घेऊन ती गोष्ट घडू शकते. अर्थात त्याकरता काही पथ्ये पाळली पाहिजेत. नियमांच्या बाहेर जाऊन काही करता कामा नये. परंतु एखादा नियम खरोखर जाचक असेल तर तो बदलून घेऊन मग आपण 'होय' म्हणू शकतो. हा एक मार्ग असू शकतो पण तो आपल्याला उपलब्ध आहे का एवढी जाणीव त्या अधिकाऱ्याला असली पाहिजे व धडपड करण्याची तयारी पाहिजे; चिकाटी पाहिजे. ह्या सगळ्या गोष्टी त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी सांगितल्या. म्हणून मला त्यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो.

शंकरराव चव्हाणांविषयी सांगायचे तर ते अत्यंत शिस्तप्रिय होते. त्यांना 'हेडमास्तर'च म्हणत असत. ते प्रशासनात वाकबगार होते. अधिकाऱ्यांचे म्हणणे नीट ऐकून घेत असत. आणीबाणीच्या वेळी ते इथे चीफ मिनिस्टर होते. त्यांनी आणीबाणीची झळ सामान्यांपर्यंत पोचू दिली नाही असे म्हणतात. मी त्यावेळी येथे नव्हतो, त्यामुळे मला प्रत्यक्ष अनुभव नाही.

शरद पवारांच्या कामाचा उरक प्रचंड होता आणि त्यांची स्मरणशक्ती दांडगी आहे. एखादी गोष्ट त्यांनी एखाद्या अधिकाऱ्याला सांगितली असेल तर ती त्यांच्या स्मरणातून कधीही जात नसे. त्यांनी एज्युकेशन, ॲग्रिकल्चर, अर्बन डेव्हलपमेंट अशी अनेक डिपार्टमेंट हाताळलेली असल्यामुळे टू गेट ग्रीप ऑन एनी इश्यू, ही वॉज व्हेरी क्वीक. आय डोण्ट नो व्हॉट हॅपण्ड टू हीम लेटर ऑन. पण आदर्श चीफ मिनिस्टर म्हणून मी त्यावेळी त्यांचा पाहत होतो, आहे आणि नेहमीच राहीन. असे हे तीन चीफ मिनिस्टर होते. त्यांनी महाराष्ट्राला बरेच काही दिले आहे. याबद्दल दुमत असणार नाही.

मी दिल्लीहून परत आलो तेव्हा प्रतिभा पाटील शिक्षणमंत्री होत्या. त्यांच्याबद्दल खास आठवणी अशा नाहीत. एक गोष्ट आठवते. एखाद्या मंत्र्याने एखाद्या फाईलवर काही आदेश दिले असतील व ते आदेश नियमानुसार

नसतील तर 'हे डिसिजन ह्या ह्या नियमांशी विपरीत आहे, म्हणून ते कॅरीआऊट करू नये. त्याचा पुनर्विचार व्हावा' असा शेरा देऊन ती फाईल आम्ही रिसबमिट करतो. प्रतिभा पाटील यांच्या बाबतीत एकदोनदा तसे झाले. सर्वच मंत्र्यांच्या बाबतीत कधी ना कधी तशी वेळ येते. शी वॉज व्हेरी नाईस मिनिस्टर. फाईल पुन्हा सबमिट केली म्हणून 'तुम्ही मला शिकवायला लागलात, यू जस्ट कॅरी आऊट, त्याचे परिणाम काय होतील ते भोगायला मी तयार आहे' अशी दमबाजी प्रतिभा पाटील यांनी कधीच केली नाही. त्यांनी त्याचा पुनर्विचार केला असेल किंवा ती फाईल परत आली नसेल. एखादी गोष्ट नियमानुसार नसेल तर ती मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देणे हे सचिवांचे कर्तव्य आहे असे आम्ही मानत होतो आणि तशा तऱ्हेच्या गोष्टी तेव्हा होत होत्या हा जो म्युच्युअल रिस्पेक्ट होता, फेथ इन इचअदर होता तसा आता राहिलेला नाही. केवळ मिनिस्टरना आवडते म्हणून एखादी कृती चुकीची असली तरी ती तात्काळ करायची अशी प्रथा तेव्हा नव्हतीच.

**प्रश्न –** भारतातल्या एका अत्यंत प्रगत राज्याचे आपण मुख्य सचिव होतात. या महत्त्वाच्या पदावरून पॉलिटील वळण देण्याचे काम होऊ शकते का?

**सुकथनकर –** मुख्य सचीव म्हणून असे पॉलिटीला वळण देणे कठीण असते. त्याला मर्यादा असतात. चीफ सेक्रेटरी म्हणून आपली काही कर्तव्ये असतात. शासनात अनेक विभाग असतात. एखाद्या समस्येकडे पाहण्याचा, तिची उकल करण्याचा त्या त्या विभागाचा वेगळा दृष्टिकोन असतो. कधीकधी हे दृष्टिकोन एकमेकांशी कॉन्फ्लिक्टिंग असतात. त्यात सुवर्णमध्य साधून त्यातून फायनल सोल्युशन कसे काढायचे ही प्रक्रिया यशस्वीपणे करणे हे चीफ सेक्रेटरीचे काम असते. शासनाच्या एखाद्या विभागाने चांगले काम केले तर त्याचे श्रेय त्या विभागाच्या सचिवाला देण्याबाबत मुख्य सचिवाने जागरूक असले पाहिजे. प्रशासनामध्ये चांगले झाले ते सगळे माझ्या लिडरशीपमुळे आणि मी दिलेल्या सूचनेमुळे झाले, पण काही विपरीत झाले तर त्याला तो विभाग जबाबदार असा दृष्टिकोन जर चीफ सेक्रेटरीने ठेवला तर संबंध प्रशासकीय यंत्रणेचा बट्ट्याबोळ होईल. संबंध यंत्रणेला आपण वेगळे वळण देऊ शकतो असे चीफ सेक्रेटरीने समजू नये.

ज्या काही इमर्जिंग गोष्टी आहेत त्याबाबत सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन विचारविनिमय करता येईल आणि होणाऱ्या प्रोॲक्टिव्ह बदलाला, पॉलिसीमध्ये अनुरूप बदल करून तोंड देता येईल. हे करण्यात चीफ सेक्रेटरीचा रोल महत्त्वाचा असू शकतो. 'असे असे होणार आहे किंवा इतर राज्यांमध्ये चालू आहे' असे एखाद्या सेक्रेटरीने लक्षात आणून दिले तर सर्वांना विश्वासात घेऊन बदल लवकर कसे होतील, जेणेकरून आपले राज्य इतर राज्यांच्या तुलनेत मागे पडणार नाही, ही जागरुकता मुख्य सचिवांनी दाखवणे गरजेचे आहे.

**प्रश्न –** दिल्लीत मराठी माणूस कुठे अडतो? पुन्हा सह्याद्रीतच का येतो?

**सुकथनकर –** दिल्लीतील प्रशासकीय वातावरण मराठी आचारविचारपद्धतीला पोषक आहे असे मला दिसले नाही. हांजी हांजी करणे, आपले मत स्पष्टपणे न मांडणे, मिनिस्टरला आवडत नसेल तर आपल्या मताला मुरड घालणे अशा तऱ्हेचे वागणे जमणे कठीण पडते. सर्वसाधारणपणे उत्तर हिंदुस्थानात असा माहोल असतो असे म्हणतात, त्यात बरेच तथ्य आहे हे मी स्वानुभवावरून सांगतो. महाराष्ट्रात काम करताना, आम्हाला जे वाटते ते व्यक्त करताना आमच्यावर कधी दडपण आले नाही म्हणूनच शंकरराव चव्हाणांनी जेव्हा मला विचारले तेव्हा मी लगेच मुंबईत येणे ते स्वीकारले.

**प्रश्न –** निवृत्तीनंतरचा मोठा टप्पा म्हणजे शिर्डी संस्थानात तुम्ही केलेली कामगिरी. हे शिर्डी संस्थानातील पोस्टिंग कसे काय झाले?

**सुकथनकर –** शिर्डी संस्थानातील पोस्टिंगनंतर जे काही घडले ते सांगताना एक तासही पुरणार नाही. त्यासाठी पुस्तकच लिहायला हवे. डॉ. लेखा पाठक ह्या शिर्डी संस्थानाच्या अध्यक्ष होत्या. 'लोकसत्ते'त त्यांच्याबद्दल काही लेख आले होते. त्यांचा कालखंड ऑगस्ट १९९४ मध्ये संपत होता. मला २९ ऑगस्टला संध्याकाळी साडेसात वाजता पवारसाहेबांचा फोन आला. मला आश्चर्य वाटले. ते म्हणाले, 'तुम्ही 'लोकसत्ते'त आलेले वाचले असेल. आता मला या सगळ्यावर पडदा पडेल असं काहीतरी करायचं आहे. तुम्ही ते चेअरमनपद स्वीकारावे. यू गो टू दी चॅरिटी कमिशनर्स ऑफिस. तेथील इन्स्पेक्टर तुमच्याकडून फॉर्म वगैरे भरून घेतील. तुम्हाला संस्थानाच्या मंडळाचा सभासद करून घेतील.'

मी म्हटले, 'धीसीज नॉट माय कप ऑफ टी, धीसीज नॉट रिलेवट टू माय एक्सपीरिएन्स' पवारसाहेब म्हणाले, 'सगळीकडे ॲडमिनिस्ट्रेशन सारखेच असते. आय वॉण्ट यू टू गो देअर'. अर्थात नॅचरली, आय काण्ट से नो. अदरवाईज देअर वॉज नथिंग रॉंग इन गोईंग देअर. दुसरा मुद्दा असा, की मला तिथल्या दैनंदिन कामात सहभागी व्हायचे नव्हते. उलट, एका नवीन क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार होती. तेथे त्या संस्थानात एवढा पैसा येतो त्याचा विकासकार्यासाठी योग्य उपयोग व्हावा म्हणून आपले काही योगदान होत आहे हे चांगलेच होते. शिर्डीला मी एक-दोनदा गेलो होतो, पण मी काही डिव्होटेड साईभक्त नव्हतो. माझे आईवडील साईभक्त होते. तेथे गेल्यावर मात्र असे जाणवले, की मी योग्य प्रकारे काही करत असेन तर बाबा माझ्या पाठीशी आहेत, मला कोणालाही घाबरायची गरज नाही, असे जे एक आत्मबळ तेथे गेल्यानंतर मिळते ते

मला आता जाणवते.

**नानिवडेकर –** साई संस्थानाबद्दल अनेक सुरस व चमत्कारिक कथा ऐकायला यायच्या. मोठ्या चोरीचा शोध घ्यायचा झाला तर मुंबई पोलिस पथक सरळ शिर्डीला तपासासाठी जात असे. संस्थानचा याला छुपा आशीर्वाद होता का? ही सगळी व्यवस्था बदलायला किती त्रास झाला?

**सुकथनकर –** संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाच्या आशीर्वादाने अशा काही बेकायदेशीर गोष्टी होत होत्या असे मला वाटत नाही. ही गोष्ट खरी की तिथे एक ट्रॅडिशन होती की मंडळावरील विश्वस्तांचा तिथल्या दैनंदिन कामात हस्तक्षेप नसायचा. त्याचबरोबर भक्तांच्या सेवासुविधांच्या दृष्टीने कशाची आवश्यकता आहे? कोणती विकासकामे करायला हवी आहेत? हॉस्पिटलमध्ये कोणत्या सुविधांची गरज आहे? अशा समस्यांचा विचारही मंडळाच्या विश्वस्तांकडून केला गेला नसावा. केवळ एक पद म्हणून किंवा दर्शनासाठी पास देणे वगैरे एवढेच त्या पदाचे स्वरूप होते.

तिकडे, खरोखर एखाद्या धबधब्या-सारखा पैसा पडतो आणि लोकोपयोगी कामे करण्यासाठी तिकडे भरपूर वाव आहे. त्या गावाचा विकास करायला हवा आहे. शिक्षणाची सोय पुरेशी नाही. रस्तेबांधणीची गरज आहे. हे सगळे कोणी नियोजनबद्ध पद्धतीने करताना दिसत नाही. कोणी सांगते, ‘मी इतका पैसा देतो. त्यातून तुम्ही होस्टेल बांधा.’ कोणी म्हणते, ‘मी इतके-इतके सोने देतो. त्याचे सिंहासन बनवा’ पण त्या देणगीदारांना कोणी असे समजावून सांगत नाही की येथे ह्या ह्या गोष्टींची गरज आहे ते तुम्ही कर.’

आमच्यावेळी असा कोणी देणगीदार आला तर आम्ही त्याला सांगायचो, ‘बाबांचं राहणीमान साधेपणाचं होतं. आम्ही या परिसराचा विकासही साधेपणांने केला आहे. तेव्हा ते ‘सोन्याने मढवणे’ वगैरे आपण बाजूला ठेवू या. हे पैसे बाबांच्या नावाने कुठेतरी सत्कारणी लागावेत असे वाटते ना? की अमक्याअमक्याने सोन्याने मढवले असा जयजयकार सतत व्हावा असे वाटते? हे तुम्ही ठरवायचे आहे.’ असे त्यांना पटवून दिले तर समाजहिताचे काय आहे, हे त्यांना पटते असे मला वाटते.

**नानिवडेकर –** मंदिराचे डिझाईन आपल्या काळात बदलले. आपण तेव्हा काही स्पर्धा आयोजित केली होती.

**सुकथनकर –** त्यासाठी आम्ही ऑल इंडिया लेव्हलवर आर्किटेक्टची स्पर्धा घेतली. दिल्लीचे बाक्रे व त्यांची पत्नी यांना प्राईज मिळाले. म्हणून त्यांनाच मंदिराचे हे काम दिले गेले. सुदैवाने आम्हाला लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो-सारखे चांगले कॉन्ट्रक्टर मिळाले. म्हणून पंधरा महिन्यांत सणासुदीच्या काळात दोन-तीन लाख भक्तांची कोणतीही गैरसोय न होता हे काम होऊ शकले. यात डेस्टिनी, हिडन हँड, ब्लेसिंग्ज, काही म्हणा... हे पाहिले ना की या सगळ्याची जाणीव होते. नुसते ऐकणे आणि घडत असताना पाहणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. म्हणून या गोष्टी अनुभवल्याशिवाय त्याची प्रचिती येत नाही.

**प्रश्न –** शिर्डीशी संबंधित अनेक विषय आहेत. दुखावलेल्या हितसंबंधियांनी थेट विधानसभेत उठवलेली राळ, नंतर सरकारने वेगळा कायदा करून आपल्या हातात घेतलेले अधिकार... पण या सगळ्यासाठी आपल्याला पुस्तकाची प्रतीक्षा करणे आवडेल. म्हणून मी एका अत्यंत महत्त्वाच्या आणि अखेरच्या टप्प्याकडे वळते. थोडे व्यक्तिगत आयुष्याविषयी जाणून घ्यावसे वाटते. आपण मुख्य सचिव असतानाही आपली पत्नी नोकरी करत होत्या. आपल्या मुलाचे, नातीचे नाव कौतुकाने घेतले जाते, त्याविषयी थोडेसे.

**सुकथनकर –** आमचे लग्न झाल्यानंतर माझे जेव्हा इथे पोस्टिंग झाले तेव्हा पत्नीने लायब्ररी सायन्सचा कोर्स केला. त्या परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच मुंबई युनिव्हर्सिटीच्या डिपार्टमेंटमध्ये तिला नोकरी मिळाली. मी सर्वात मोठा असल्यामुळे माझ्यावर भावंडांची काही प्रमाणात जबाबदारी होती. तिने वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे पंचवीस वर्षे नोकरी केली. संसाराला आर्थिक हातभार लावला. एक काळ असा होता, की ज्याचा बेसिक पगार दोन हजारांपेक्षा जास्त आहे त्याचा डिअरनेस अलाऊन्स गोठवण्यात आला होता. त्या दोन-तीन वर्षांच्या काळात पत्नीने आर्थिक हातभार लावला नसता तरआम्हाला मुलांना चांगले शिक्षण देणे कठीण झाले असते.

माझा मुलगा बी.कॉम. होऊन त्याने मॅनेजमेंट स्टडीज केले. आता तो एच.डी.-एफ.सी. मध्ये उच्च अधिकारपदावर आहे. माझे जावई टाटा कंपनीत चार्टर्ड अकाऊंण्टण्ट आहेत. आता नातवंडांकडे बघायला हरकत नाही. माझ्या मुलाचा मुलगा इंडियन स्कूल सर्टिफिकेटमध्ये महाराष्ट्रात पहिला आला. मुलीची मुलगी तन्वी लाड ही अंडर सिक्स्टीनमध्ये बॅटमिंटनमध्ये नॅशनल चॅम्पियन म्हणून यशस्वी झाली. तेव्हा आता नातलगांकडून कॉलर टाईट करायला हरकत नाही.

**नानिवडेकर –** आता अशा निवांत वेळी ‘अग्नी’च्या बैठकीला जावे लागते की तुमचे आवडते संगीत ऐकत बसावेसे वाटले?

सुकथनकर – दोन्ही करावे लागते. ‘अग्नी’ ही अशी संस्था आहे की तिच्यासाठी मला खूप समय व्यतीत करावा लागत नाही. जेव्हा पॉलिसी इश्यूचा विषय असतो तेव्हा आमचे बोर्ड ऑफ ट्रस्टी हॅव टू बी अ‍ॅक्टिव्ह.

मला शास्त्रीय संगीताची आवड आहे. रेडिओवर रात्री दहानंतर नॅशनल प्रोग्रॅम किंवा रविवारी सकाळी होणारा संगीताचा कार्यक्रम मी ऐकतो. त्यात सरस्वती राणे व हिराबाई बडोदेकर यांची जुगलबंदी असायची. अनेक कलाकारांचे कार्यक्रम ऐकायला मिळायचे.

पहिले स्वामी हरिदास स्नेहसंमेलन कावसजी जहांगीर हॉलमध्ये झाले. ते मी अटेंड केले होते. एकदा मी एका म्युझिक प्रोग्रामला गेलो होतो. आम्ही तेव्हा खारला राहायचो. परत येताना मला गाडीत झोप लागली. त्यामुळे मी थेट बोरिवलीपर्यंत गेलो. तेव्हा कार्यक्रम पहाटे तीन-साडेतीन वाजेपर्यंत असायचा. माझ्या अगोदर असलेले आयुक्त एम. जी. देसाई यांनी शास्त्रीय संगीतात दिलचस्पी दाखवून म्युनसिपल कमिशनरच्या घरी काही कार्यक्रम ठेवण्याची प्रथा सुरू केली. हिंदू कॉलनीत असलेली कला अकादमी त्यांनीच स्थापन केली. मी आयुक्त असतानासुद्धा अनेक थोर कलावंत गाऊन गेले. तेथे वर एक हॉल होता. तेथे गाणे जे रंगायचे. पर्सनल रॅपो बिट्वीन द सिंगर ॲण्ड लिसनर यांच्यात जुळून यायचा.

**नानिवडेकर –** आवडते गायक कोणते?

**सुकथनकर –** असे सांगणे कठीण आहे. पंडित जसराज, भीमसेन जोशी हे आवडते आहेतच. त्याशिवाय अजय चक्रवर्ती व त्यांची मुलगी यांचे गाणेही आवडते. वडिलांपेक्षा मुलगी अधिक प्रतिभावान आहे. हे दोन गायकसुद्धा मला टेरिबल इम्प्रेस करतात. मला व्होकल म्युझिक जास्त आवडते.

**नानिवडेकर –** आपला नवा ध्यास आहे कोकणाचा! त्यासंबंधी...

**सुकथनकर –** कोकण हा असा प्रदेश आहे, की त्याच्याकडे निसर्गदत्त गोष्टी आहेत, मग तो मागासलेला का? कोकण विकासाच्या दाराशी आला आहे. या काळात जे गुंतवणुकीचे निर्णय घेतले जातील त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. म्हणून आपला प्रशासकीय अनुभव, कामाची पद्धत व मिळवलेले गुडविल यांचा उपयोग करून कोकणच्या विकास-कार्यात हातभार लावता आला तर... असे मला वाटू लागले.

संजय यादवराव यांची कोकणभूमी प्रतिष्ठान ही संस्था आहे. ही इज यंग ॲण्ड डायनॅमिक लिडर हू हॅव राईट व्हिजन ॲण्ड हू इज नॉट रिलेटेड टू एनी पोलिटिकल पार्टी. संजय यादवराव यांना थोडीशी पोलिटिकल पार्श्वभूमी आहे. ते बीजेपीमध्ये होते, पण आता त्यांनी त्याचा पूर्णपणे त्याग केला आहे असे मला जाणवल्यावर त्यांना मदत करण्यासाठी दापोलीला झालेल्या परिषदेत मी सहभागी झालो. नंतर आम्ही एक कोकण व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे. ते आम्ही शासनापुढे ठेवणार आहोत. त्यामधून पुढे कसे जाता येईल या दृष्टीने चाचपणी चालू आहे. 'उत्तुंग ते अथांग' असे कोकणचे वर्णन केले जाते ते यथार्थ आहे. सातशेवीस किलोमीटर किनारा व इतरही फेवरेबल वातावरण, निसर्गसंपत्ती असूनही आपण काही करत नाही म्हणून जे काही करता येईल ते करावे असे मला वाटते. ●


## यशवंत पाठक यांची लोकप्रिय पुस्तके

### अंगणातले आभाळ – यशवंत पाठक

स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या कष्टमय पर्वात मध्यमवर्ग दुष्टचक्रात सापडला व त्याने आपली परंपरा, वृत्ती यांचा त्याग केला. परंतु नंतरच्या आर्थिक प्रगतीबरोबर आलेल्या सुस्थैर्यामध्ये आठवले ते परंपरेचेच संचित..... सामाजिक स्थित्यंतरातील सापडलेल्या ब्राह्मण तरुणाची सरस आत्मकहाणी.
मूळ किंमत ३०० रुपये; सवलतीत १८० रुपये
घरपोच केवळ २०० रुपयांत

### चंदनाची पाखर – यशवंत पाठक

परंपरेचा शोध घेणाऱ्या उत्कट, भावरम्य कथा.
मूळ किंमत २०० रुपये; सवलतीत १२० रुपये;
घरपोच १४० रुपयांत



चारही पुस्तके एकत्र ५०० रुपये; घरपोच ५५० रुपयांत

### आभाळाचं अनुष्ठान – यशवंत पाठक

आभाळाचे व्यापकपण चिरंजीव असते. तेच अनुष्ठान असते. ते जपता जपता मानवी मनातल्या सशक्त जाणिवांना आपण सहज साद घालतो. त्यातल्या आंतरिक शक्तींशी संवाद साधायला बघतो. सहनसिद्धी आणि व्यापकता यांचे अनुष्ठान लाभलेले हे आभाळ यशवंत पाठकांच्या लेखनातून सहजपणे साकारते; त्यातल्या रसाळपणाने भावबद्ध होते.
मूळ किंमत २०० रुपये; सवलतीत १२० रुपये
घरपोच केवळ १४० रुपयांत

### येणे बोधे आम्हा। असो सर्व काळ – यशवंत पाठक

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात सोनोपंत दांडेकरांचे कार्य अविस्मरणीय आहे. तत्त्वज्ञानासारखा विषय अभ्यासून सोनोपंतांनी सामान्य माणसाच्या संस्कृती कारणाशी अखंड नाते जोडले, त्यामुळे वारकरी संप्रदायात वर्तमानाचे नवे भान आले. या भानाला पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची बैठक देणाऱ्या सोनोपंतांचे रसाळ चरित्र.
मूळ किंमत २०० रुपये; सवलतीत १२० रुपये;
घरपोच १४० रुपयांत

# अमेरिकेतील मराठी माणसाचे भावजीवन

**पद्मा कऱ्हाडे**

डॉ. प्रकाश लोथे यांचं 'वाटचाल' हे नाटक खूप भावलं. परदेशात राहणाऱ्या मराठी माणसांची स्पंदनं त्यात जाणवली. एखादा अशिक्षित, अडाणी खेडूत, ज्याने आपलं गाव, खेडं कधीही सोडलेलं नाही, तो जेव्हा मुंबईसारख्या शहरात प्रथम पाऊल ठेवतो तेव्हा तो जितका गोंधळेल- भांबावून जाईल, त्याची जशी व जी अवस्था होईल; अगदी तशीच अवस्था एखादा मराठी माणूस अमेरिकेत पहिल्यांदा जाईल तेव्हा होते. डॉ. लोथे यांनी त्याचं पहिल्या प्रकरणात केलेलं वर्णन खूप आवडलं. मी अमेरिकेत प्रथम गेले होते तेव्हा माझी अगदी तशी अवस्था झाली होती. त्यामुळे ते वर्णन वाचून पुनः-प्रत्ययाचा अनुभव आला.

अमेरिकेत नेहमी वापरले जाणारे शब्द, पण ज्यांचा आपल्याला परिचय नाही, त्यांचा उल्लेख, त्यांचा अर्थ लक्षात न आल्यामुळे झालेला गोंधळ खूप छान वर्णन केला आहे. उदा. रेस्ट रूम. तो किस्सा वाचून लक्ष्मण देशपांडे यांच्या 'वऱ्हाड निघालंय लंडनला'मधील विमानतळावर घडणाऱ्या प्रसंगाची आठवण झाली.

इकडे तर्खडकर पद्धतीनं इंग्रजी शिकून, अमेरिकेत कस्टम ऑफिसरला सामोरं जाणं, त्याच्या प्रश्नांची उत्तरं देणं, त्यावेळी होणारी त्रेधातिरपिट, भांबावलेपणा, ओठावर अनवधानानं येणारे मराठी शब्द- त्यांच्यासाठी योग्य पर्यायी इंग्रजी शब्द शोधण्यासाठीची धडपड- ते न आठवणं, मग अशा वेळी आपल्या इंग्रजीत त्या ऑफिसरला वर्णन करून तो शब्द, त्याचा अर्थ सांगण्याचा केलेला प्रयत्न... लाजवाब! (उदाहरणार्थ मुरमुरे)

अमेरिकेला जाताना आपल्याबरोबर येथील वस्तू न्यायचा सोस (उदाहरणार्थ पाटावरवंटा, लोणची इत्यादी) ब्लेंडर हा शब्दही त्यावेळी माहीत नसणं, त्यावर पाटा-वरवंटाच वापरणं का चांगलं याचं स्पष्टीकरण, समर्थन त्या कस्टम ऑफिसरला देणं याचं खूप छान वर्णन केलं आहे.

अमेरिकेत लागणारे सेल, त्याकडे पाहण्याची आपली- मराठी माणसाची- दृष्टी, त्यातून होणारी पैशांची बचत, इंडियात येताना लोकांना देण्यासाठी गिफ्ट आणाव्या लागतात- त्यासाठी अशा सेलमधील वस्तू घेणं... ही आपली मराठी लोकांची मानसिकता चांगल्या प्रकारे शब्दांत उतरवली आहे.

अमेरिकेत राहणाऱ्या मराठी माणसाच्या मनाची त्रेधातिरपिट, त्याच्या व्यथा, तेथील जीवनपद्धतीची- संस्कृतीची व आपल्यावरील पिढ्यान् पिढ्या झालेल्या संस्कारांची तुलना डॉ. प्रकाश यांनी सुंदर शैलीत व्यक्त केली आहे. या विचारांमुळे स्वतः, स्वतःच्या मनाशी साधलेला संवाद - विश्वनाथ व विसुभाऊ या दोन व्यक्तिरेखांमधून चांगला रंगवला आहे.

'कुंकवाचा धनी' या प्रवेशात विश्वनाथच्या मनाची होणारी घालमेल प्रभावीपणे व्यक्त केली आहे. उमाचं कुंकू नसलेलं कपाळ पाहताना, अमेरिकन जीवनपद्धतीत ती वाहवत तर जाणार नाही ना? याची विश्वनाथच्या मनाला लागणारी टोचणी क्षणभर चिंतातूर करते. विसुभाईच्या रूपानं स्वतःचीच घातलेली समजूत, विश्वनाथला चिंतामुक्त करते. ते आपल्यालाही पटतं.

विश्वनाथच्या शेजारी राहणाऱ्या ॲंडरसन कपलच्या सनबाथविषयीचं वर्णन वाचताना, ते कुठेही थिल्लर वाटत नाही. त्या प्रसंगामुळे उमाची होणारी घालमेल, अस्वस्थता, नवऱ्यावर आणि मुलावर काय संस्कार होतील याची उमाला वाटणारी काळजी अगदी स्वाभाविक वाटते. आपल्या परीनं ती करत असलेले प्रयत्न प्रामाणिक वाटतात. उदाहरणार्थ, पोलिसांना फोन करणं, ॲंडरसन कपलला हुसकावून लावण्याचा निष्फळ प्रयत्न. याच संदर्भातला बंटी व विश्वनाथ यांचा संवादही मनाला स्पर्शून जातो.

'शेवटचा फोनकॉल' प्रवेश वाचून कुठल्याही भारतीयाचं मन हेलावून जाईल. आईची इच्छा नसताना, अमेरिकेत आलेल्या विश्वनाथला, आईची शेवटची इच्छाही पूर्ण करता आली नाही याची विश्वनाथच्या मनाला लागलेली टोचणी वाचताना, आपलंही मन हेलावून जातं.

'मागच्या बाकड्यावरचा मजनू' प्रवेशामध्ये अचानक अनोळखी किंवा कुठून तरी लांबची ओळख काढून आलेल्या पाहुण्याला -साधुवाण्याला- रिसिव्ह करणं, घरी आणल्यावर त्याची बडदास्त ठेवणं (मनात नसतानाही), त्याला परत एअरपोर्टवर सोडणं, यात विश्वनाथची होणारी चरफड. कारण त्याच्या विकेण्डची वाट लागलेली असते. त्याचं छान वर्णन केलं आहे.

सत्तरच्या आसपास अमेरिकेत गेलेली मराठी माणसाची पिढी ख्रिसमस ट्रीचं प्रेमानं

स्वागत करू शकली नाही. परंतु त्यांच्या मुलांच्या पिढीनं मात्र ख्रिसमस ट्रीशी नातं जोडून घेतलं आहे. सत्तरच्या पिढीतील हा मराठी माणूस डोक्यात, सतत मल्टिप्लिकेशन फॅक्टर (डॉलर-रुपयांचा) घेऊनच तिथं राहतो, वावरतो आणि त्यामुळे काही वेळा जीवनाची मजाच घालवून बसतो की काय? याचं जिवंत वर्णन 'ख्रिसमस ट्री' वेशातून वाचायला मिळतं.

पण हाच मराठी माणूस, जो भारतात स्वयंपाकघरात कधी पाऊलही न ठेवणारा, पण इकडे अमेरिकेत आल्यावर, आपोआप परिस्थितीनुसार बदलतो आणि जमेल तेवढी व तशी बायकोला स्वयंपाकघरात मदत करू लागतो.

पुढे, नव्वदच्या दशकात याच पिढीनं संगणकाशी जुळवून घेतलं. त्याला आपलंसं केलं. या संगणकाचं डॉ. लोथेंनी केलेलं वर्णन आवडलं.

'या यंत्राने दूरचे देश जवळ आले, अन् जवळची माणसं दूर गेली।
अबोल वस्तूंना बोलकं केलं अन् बोलक्या माणसांची वाणी चोरली।।

ई-मेल आयडी, पासवर्ड संदर्भातील लिहिलेल्या गमतीजमती छान आहेत. उमा मात्र संगणकाशी फारशी मैत्री करू शकली नाही. घरात संगणक असूनही उमा हातानंच पत्र लिहिते.

शेवटी, उमा आणि विश्वनाथ नृत्य शिकायला जातात. तेव्हा त्यांची होणारी तारांबळ वाचून आपणही हसू लागतो. इतकं ते वर्णन जिवंतपणे कागदावर उतरवलं आहे. आपल्या मनःचक्षूंसमोर विश्वनाथ, उमा आणि त्यांची टिचर लोलिटा यांचा नाच दिसतो. परंतु लोलिटाच्या धाडसी वर्तनामुळे, आपला नवरा आपणच सांभाळायला हवा या निर्णयाप्रत उमा येते.

सर्वात शेवटी अमेरिकन जीवनाशी सर्व देशांतील मंडळी जुळवून घेतात. भारतीय मंडळी हे तेथील पिझ्झावरील चटकदार आल्याचं लोणचं आहे व ते तेथील जीवनाचं अविभाज्य अंग झालं आहे. या नोटवर नाट्याचा शेवट केला आहे.

कुठल्याही मराठी माणसास, विशेषतः ज्यांनी अमेरिका वारी केलेली आहे त्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद होईल. एक चांगली नाट्यकृती अनुभवण्याचं समाधान मिळेल.

अजून एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते, की ही नाट्यकृती वाचत असताना, डोळ्यांसमोर सतत दिलीप प्रभावळकरांची मूर्ती उभी राहते. त्यांनी ही भूमिका किती जिवंत केली असेल; ते स्वतः ही भूमिका जगले असतील हे पदोपदी जाणवतं.

डॉ. प्रकाश लोथे यांना मनापासून शुभेच्छा. त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन.

**सौ. पद्मा कऱ्हाडे**
**'वेदविहार', बिल्डिंग नं. ५,**
**फ्लॅट ३०१, कोथरूड, पुणे-४११०३८**
**मोबाईल - ९८५०१ ४३५५७५**




# वाटचाल

डॉ. प्रकाश लोथे

यांचे नाटक 'ग्रंथाली'कडे उपलब्ध
प्रस्तावना - **दिलीप प्रभावळकर व विजय केंकरे**
मूल्य १०० रुपये • सवलतीत ६० रुपये
७५ रुपयांत घरपोच

---

नीरजा 'आभाळ माझं' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात फार चांगलं बोलल्या. या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक, कवयित्री आणि अध्यक्ष, अखिल भारतीय बालकुमार मराठी साहित्य (सोलापूर २००६-०७) विजया जहागीरदार उपस्थित होत्या.

त्यांचं ५१ वं पुस्तक 'रणरागिणी' (झाशीची राणी) हे नुकतंच प्रकाशित झालं. विशेष म्हणजे कवयित्री नीरजा गोरेगाव (पश्चिम) येथे दरमहा 'कवितांगण' ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या, तेव्हा आमची चांगली ओळख झाली होती. त्या इंग्रजी भाषेच्या प्राध्यापक असूनही नावाजलेल्या मराठी कवयित्री आहेत. मी आणि विजयाताई कार्यक्रम संपल्यावर 'नीरजा' यांना खास भेटलो. दोघींची सविस्तर ओळख करून दिली.

**- म.बा. कुरूलकर**

---

संपादक कृतार्थ!

महोदय,

'ग्रंथाली'चा नवीन उपक्रम कृतार्थ मुलाखतमाला ('रुची'चा जून २००८) पहिले पुष्प डॉ. अजित फडके यांची प्रदीप भिडे यांनी घेतलेली मुलाखत फार आवडली. फार मौलिक माहिती दिली आहे.

**सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६